■ वर्ष: ६ वे
■ अंक: १२ वा
■ डिसेंबर २०२१
■ किंमत: ४० रूपये

# मासिक शिक्षणयात्री



## आकाशी झेप घ्या रे... लेकरांनो...

# लेखकांसाठी सुचना

१. लेखांचा विषय प्रचलित आणि संक्षिप्त असणे आवश्यक आहे.

२. प्रकाशित करणाऱ्या येणाऱ्या लेखांची शब्दमर्यादा ५०० ते १००० असावी आणि लेख संगणकीकृत करून shikshanyatri11@gmail.com, pragatiartsshirpur@gmail.com या मेलवर पाठवावी.

३. संगणकीकृत केलेल्या मुद्रित अक्षरांसाठी (श्रीलिपी देव ७०८) Shree lipi- Dev708 /google marathi/ mangal font फॉन्ट साईज १५ असावे.

४. स्वीकृत करण्यात येणाऱ्या लेखांचे पुनर्संस्कारित करण्याचे सर्व हक्क संपादक मंडळाकडे राहतील.

५. लेखात अद्यावत माहिताचा वापर करून भाषा सुस्पष्ट व समजण्यास सोपी असावी.

६.लेखकाने प्रथम पृथ्वावर लेखाचे शीर्षक, लेखकाचे नाव, पासपोर्ट साईज फोटो, भ्रमणध्वनी व पिनकोडसह पत्ता अवश्य द्यावा.

७. लेख पाठवितांना लेखकांकडून अनेकवेळा टंकलेखनामध्ये चुका होत असल्याचे आढळते, त्यामुळे वाक्यांचा संदर्भ लागत नाही. तरी कृपया लेख पाठवितांना पुन्हा एकदा काळजीपूर्वक वाचन करून पाठवावा.

८. मासिकाच्या वर्गणीचे धनादेश व डिमांड ड्राफ्ट – शिक्षणयात्री या नावाने संपर्क पत्त्यावर पाठवावेत.

संपर्क :शिक्षणयात्री क्रांतीनगर ता.शिरपूर जि.धुळे चलभाष : 8208301001 shikshanyatri11@gmail.com

संवाद



*सुभाष कुलकर्णी*
*संपादक*

धन्य ते माता-पिता !

हो खरोखरंच अशा माता पित्यांचा आदर सन्मान व्हायलाच हवा. ज्यांनी आपल्या विकलांग, मंद मुलांना सांभाळतांना कधीच कसर सोडली नाही. त्यांची कधी जीवावर आलेली नाही. एम.के.बापूंनी आपबिती थोडीशी वर्णीली नव्हे यापेक्षा असंख्य अडचणी ते झेलत असावेत. तरी आला दिवस गोड मानून घ्यावा या विचारानं ते आपल्या गौरवशी मजेत जीवन जगताहेत.

असे अनेक गौरव समाजात आहेत. आपल्या मुलाच्या पदरी ही विकलांगता आली यामुळे अनेक पालक खिन्न दिसतात. काही त्रासिक मुद्रेने नेहमीच चिडचिड करतात. तर काहीजन आपल्या नशीबाला कोसत मुलांना मतीमंद शाळेत पाठवतात. त्यांना सांभाळण्याच्या त्रासापासून दूर होण्याचा प्रयत्न करतात. सर्वच मतीमंद मुलांच्या पालकांचा असा स्वभाव नसतो. मुलांची दैनंदिन कामे उरकण्यापासून त्यांचे खाणंपिणं, रहाणं, चालणं, बोलणं अशा अनेक बाबीत सहानुभूतीपूर्वक वागणूक पहायला देखील मिळते. वास्तविक मतीमंद मुलांची चिडचिड,हेका हा सहन करण्यापलीकडे असतो. त्याला खूपच सहनशील व्हावे लागते. नव्हे संयम असावाच लागतो. शेवटी आपले मूल आहे ते ! आपल्या मूलाची भूक आपल्यालाच कळेल. त्याचे वेडेवाकडे बोलणं असो, हट्ट असो, मारणं असो, तोंडातून सतत लाळ गाळणं असो अशा सर्व वागणूकीला या पालकांना संयमाने घ्यावे लागते.

असाच संयम,धीर,सहनशीलता एम.के.बापूंप्रमाणेच अन्य पालकातही यायला हवी. वास्तविक अशा मुलांचे मायबाप झालो म्हणून मनाला कोसणारे पालकही आहेत. मात्र अशा पालकांनी एम.के.बापूं सारख्या धीरोदत्त पालकांचा आदर्श डोळ्यासमोर ठेवायला हवा आणि आपल्या लेकराने आकाशी झेप घेण्याची उर्मी बाळगायला हवी.

# अंतरंग


आकाशी झेप घ्या रे लेकरांनो
एम.के.भामरे/ ३

शासकीय समाजसेवा
डॉ.ह.ना.जगताप / ८

मातृह्रदंयी शिक्षक:साने गुरूजी
किरण देशमुख / ९

खारीचा वाटा
डॉ.मेघश्री दळवी / १३

गुरूजी तू मला आवडला
विजया हिरेमठ/ १५

स्त्रीभाव विश्वाचा अचूक अन्वयार्थ
सारीका रंधे / १७

सहजीवन वेगवेगळे
डॉ.नंदा हरम/ १९

शिक्षक कृतज्ञतानिधी
सत्यवान शिरसाठ / २२

शासन निर्णय
/ २३



समृद्ध शिक्षण संस्कारासाठी ...

मासिक शिक्षणयात्री

।। ज्ञानम् सर्वजण हिताय ।।

वर्ष : ६ वे अंक: १२ वा डिसेंबर २०२१

**वार्षिक:रू.४००/-** **द्वैवार्षिक:रू.७००/-**

**त्रैवार्षिक:रू.१०००/-**

मार्गदर्शक
मा.पुरूषोत्तम भापकर (भाप्रसे)

मानद संपादक
सुभाषदादा कुलकर्णी

उप संपादक
संदेश नंदकिशोर हजारे

संपादन सहाय्य
डॉ.दिपक बाविस्कर
डॉ.युवराज पवार

अंक जुळणी
प्रगती आर्टस्,शिरपूर धुळे

मुद्रितशोधन
डॉ.युवराज पवार

मुखपृष्ठ
गौरव आणि गजानन

कार्यालय प्रमुख
जगदीश पाटील

शिक्षण यात्री या नावाने चेक/मनीआर्डर पोस्टाने पाठवू शकतात.
Online पेमेंट साठी – खाते नाव–शिक्षणयात्री Shikshanyatri
बँक ऑफ बडौदा (राष्ट्रीय कृत) No.13320200000322
IFSC Code : BARB0SHIRPU
वर्गणी पाठविल्यास पत्ता व जमा पावती बाबत कळविणे
संपर्क पत्ता– संपादक शिक्षण यात्री
क्रांतीनगर मु.पो.ता.–शिरपूर जि–धुळे ४२५४०५
(मोबा.८२०८३०१००१/९८५०९६४६०१)


**प्रतिनिधी सहाय्य**
**पुणे-** रमेश काळे,
**मुंबई-** जयपाल गिरासे,
**नाशिक-**किरण पाटील,
**सोलापूर-** उमेश काळे,
**औरंगाबाद-** रवि गारूडकर,
**परभणी-** युवराज माने,
**जळगांव-** प्रविण माळी,
**नंदुरबार-** तुकाराम धनगर,
**अमरावती-** रूपेश माने,
**कोल्हापूर -** गुलाब बिसेन,
**सातारा -** विनोद भोजने,
**बीड -** अनंत दिक्षित,
**लातूर -** पंढरीनाथ चिभडे,



**लेखात व्यक्त झालेली मते लेखकांची व्यक्तिगत समजावी पीआरबी ॲक्टनुसार कायदेशीर जबाबदारी कार्य.संपादकांची राहील सर्व दावे शिरपूर न्यायकक्षेंतर्गत.**

मुखपृष्ठ विशेष

# आकाशी झेप घ्या रे लेकरांनो!




एम.के.भामरे

शिरपूर-धुळे


हो खरच..,.
आंतरराष्ट्रीय समस्यांवर चर्चा करतांना हे दोन तरुण.
गौरव  व गजानन..
काय बरे चर्चा करत असतील हो हे?
भडकणाऱ्या महागाईची?
राजकारणाच्या अवमुल्यना ची?
ग्लोबल वार्मिंगची?
की ढासळणाऱ्या मुल्यांची?
नाही..!
मग?
स्वतःच्या लग्नाची?
आपल्या करीअरची?
संसाराची?
की
तारुण्य सुलभ प्रेमाची,लव्ह लेटर्सची ,भटकंतीची?
छेः...
अजिबात नाही हो..
ते मस्त पैकी आपल्याच विश्वात गुंग आहेत..

गजाननः तु जजजजजजजजेजजेजेज जेवला का रे?
गौरवः नाही रे माझे पप्पा जेवु घालतील..
गजाननः तुततततततु माझ्याझ्या गावावावाला येतोतो का रे?
गौरवः नाही भौ,,माझी मम्मी रागवेल...बघ रे त्या अमोलने माझे नाव घेतले.त्याला मार ते...
गजाननः हो हो  तुतु कटींग का केकेलीली नाही..
गौरवः स्टँड वर चालतो का?
गजाननः .ननही भो..
गौरव : बघ रे त्या ईस्तरीवाला केलासने माझे नाव घेतले..त्याला मार ते..



गजाननः  हुं हुं हुं हुं
गौरवः मला भरपुट झाले रे.कापुन टाकं
गजाननः हं हंहंहं काकापुपुपुपुन टाटाटाककक...

अशा या गप्पा रंगल्यात हो..
मध्येच हसायचे ,मध्येच काहीतरी बोलायचे,,
दोन्ही ही दिव्यांग..मतीमंद..गतीमंद
निसर्गाने जसे बनवले तसे आनंदाने जगणारे..
आपल्या आईवडीलांवर पुर्णपणे विसंबुन असणारे.
आपलं छोटसं विश्व..
ना उँची उडाण
ना उंचे सपने
सारी दुनिया से
क्या लेना
क्या देना
सिर्फ माँ बाप अपने
असं या दिव्यांगाचं जीवन.
जगाची फिकीर नाही..
जीवनाची तमा नाही.
स्वप्न नाही,भविष्य नाही
आपलं छोटसं आस्तित्व घेवुन जगणारे,,
ना लालसा पैशांची
ना हाव सत्ता संपत्तीची
पर्वा नाहीच त्यांना
दिव्यांग अवस्थेची!
.
घार हिंडते आकाशी
चित्त तिचे बाळापाशी

या उक्तीप्रमाणे त्यांचे आई बाप सदैव त्यांच्यावर लक्ष ठेवुन असतात..याची जाणीव त्यांना असावी वा नसावीच.

पण त्यांच्या आईबापाला?

याचे उत्तर शब्दातित आहे.

ते काहीही असो हो,

पण हे दोन दोस्तारांचा एकमेकांशी चाललेला संवाद पाहुन त्यांचे आईबाप मात्र खुपच सुखावले आहेत.

त्यांच्या लेखी खरच त्या वर नमुद केलेल्या गप्पा मारताहेत अस्सच वाटतय,,

कशाका असेना..



वेड्या वाकड्या का असेना..
तर्कसंगत का नसेनात..
पण ते गप्पा मारताहेत,
एकमेकांच्या पाठीवर हात ठेवुन कौतुक करीत आहेत..
एकमेकांना धीर दिलासा देत आहेत,

स्वतः असहाय असलो म्हणुन काय झालं रे,पण मी तुझ्या पाठीशी आहे,।

अशी हिमंत देताहेत.

अहो, जे चांगली मुलंही करणार नाहीत ते काम आपले लाडके बालकं करताहेत याचा आभासी का असेना, आनंद या मायबापाला आहे.

ही ,आणि ..बालके?
असं कसं हो?
हा सुज्ञ जगाचा सवाल,

पण पस्तीशीच्या घरातले हे तरुण त्यांच्या आईबापांसाठी तरुण बालकेच..

हो,,य,,

बालकेच !कारण ती बालकेच आहेत. निरागस..निर्मळ.. निरपेक्ष.. निःस्वार्थ.. आणि निर्भेळ असे ..

पुर्णतः ब्रह्मचारी,,
त्यांच्या गप्पाही तशाच
नि रा ग स

पण मायबापांसाठी आपल्या लेकरांच्या गप्पा या आंतरराष्ट्रीयच!

व करीयरच्याच..

आकाशात झेप घेण्याची ऊर्मी दाटलेले त्यांचे डोळे,

आयुष्यात काही तरी बनण्याची त्यांच्या मनाची तयारी..

पण निसर्गाने त्यांच्या रथाची चाके विकलांगतेच्या गर्तेत फसवलेली..

अशावेळी साथ शोधली आहे त्यांनी एकमेकाची..

अशी बालकं पोटी येणं म्हणजे आमचे पाप का हो?

पुन्हा सुज्ञ जगाचा सवाल,,

पण नाही हो मंडळी..

हे आमचं कुठल्या जन्माचं पाप नाहीच..उलट आमचं ते पुण्याचं फळ आहे,

आम्ही भाग्यशाली,,

आमच्या पोटी ही पोरं जन्माला आली,

या पोरांचा सांभाळ कोण बरे करेल?

हा निर्मात्या भगवानला प्रश्न पडला असावा,

यासाठी सहनशील,न चिडणारे,गपगुमान सोसणारे आई बाप कोण असतील? याचा शोध देवाने घेतला असेल.त्या शोधांती देवाच्या परीक्षेत आम्ही मारबाप ऊतरलो असणार,.

केवढं हे भाग्य मंडळी!

या लेकरांचा सांभाळ आम्ही शिक्षा म्हणुन का करावा?

ते फळ म्हणुन आनंदाने तो करावा.

मतीमंदांसोबत जगतांना मनाच्या आरोह अवरोहाचे तरंग मोठे विचित्र असतात.

आईबापच ते जाणतात.

कितीही मनाचा मोठेपणा दाखवला तरीही शेवटी ती ही हाडामांसांची माणसंच!

त्यांनाही भावनांचा उद्रेक दाटतो,

काश! आपलीही पोरं सुदृढ असती तर !

अशा विचारांनी तीही भावूक होतात.

पण वेदनांचे वेद करायची कला अंगीकारुन ते आनंदी दिसतात.

मतीमंदां सोबत जगण्यातही वेगळीच मजा असते.

आम्ही तर आमचे मिशनच करुन घेतले ते मतीमंदांसोबत,दिव्यांगा सोबत,अनाथांच्या सोबत राहण्याचे.

वेगवेगळ्या माध्यमांनी त्यांना आनंद देणे,लोकांचे वाढदिवस त्यांच्या सोबत साजरा करणे,दिवाळी दसरा त्यांच्यासह मनवणे,नरक चतुःर्दशी ला त्यांना अभ्यंग स्नान घालणे यात जो आनंद मिळतो तो आगळा वेगळाच.

म्हणुन आम्ही सर्वांना नेहमी आवाहन करतो,

की निर्मिकाने आम्हाला सुदृढ घडवले हीच त्याची मोठी देन..

ही देन दिव्यांगासाठी वापरावी.

भिऊ नकोस मी तुझ्या पाठीशी आहे

ही स्वामी समर्थांची साथ मनाला हुरुप देते,चैतन्य देते.

तसेच आपणही दिव्यांगाच्या सोबत जगलं पाहीजे.त्यांच्या मनाला हुरुप येईल असा व्यवहार केला पाहीजे.

त्यांच्या मनाचे बूरुज ढासळायला लागतात तेंव्हा आपल्या प्रेम,सहानूभूती,सहकार्य,दिलासा,सहारा च्या फुंकरी मारल्या पाहीजेत.

वाचकहो,

ही एक सत्य गोष्ट आहे.पण ती लिहु नका असे बायकोने बजावले आहे,ऊगाच आपल्या वेदना दुसऱ्यांना सांगु नये असे तिचे व्यवहारी मत आहे.पण आनंद जसा वाटल्याने द्विगुणित होतो तसेच वेदना ह्या दुसऱ्यांना सांगण्याने कमी होतात असे माझे अव्यवहार्य मत आहे.म्हणुन तिचा राग पत्करुन ही गोष्ट लिहिली आहे

नाम मे क्या रख्खा है?

असं सर्व जण म्हणतात.

पण नाही हो...

नाममे बहोत कुछ होता है हां..

ते असं झालं...

आमचा एकुलता एक सुपुत्र गौरव जेवणच करत नाही.

(फीटच्या गोळ्यांमुळे भुक मंदावते व कधी मती मंदत्वाची लहर म्हणून)मग जीवन जगण्यासाठी त्याच्या पोटात दोन घास पडायलाच हवेत व शरीराला आवश्यक ते व्हिटॅमिन्स मिळायला हवेत म्हणुन आम्हा उभयतांचा प्रचंड आटापिटा चालतो.

आम्ही जेवायला बसतो तेंव्हा त्याला आग्रह करतो.पण तो जेवतच नाही.

मग केंव्हातरी हळुच त्याच्या तोंडुन

मला खायला काय देते?

असा शब्द निघाला रे निघाला की आमच्या आनंदाला पारावर नसते!,

आम्ही लगेच किचन मध्ये धावाधाव करतो.

कारण केंव्हा त्याची भुक मरेल वा केंव्हा मुड बदलेल हे सांगता येत नाही.

म्हणुन पडत्या फळाची आज्ञा समजुन

ड्राय फ्रुटस् ,फळे,चिवडा वगैरे देतो.पण त्याला ते आवडत नाहीत.मग आम्ही फटाफट कांदे चिरतो,बटाटे चिरतो,लसुन निवडतो..गॅस पेटवतो

आणि हातघाईच्या लढाई सारखं

फटकन कधी आमलेट,कधी भुर्जी,कधी पाथरा,कधी भेळ,कधी पोळी काला,कधी खमन असे मेनु बनवतो.

त्याला ताटात गरमागरम परसतो.

पण तेवढ्यात त्याचा मुड जातो.

मला नाही काहीच खायचं...

असं म्हणुन नकार देतो,

आम्ही घास धरुन त्याच्या तोंडात टाकण्याचा कसोशीने प्रयत्न करतो.

गाणे म्हणतो,गाडीवर फिरण्याचे,गावाला जाण्याचे आमिष दाखवतो,

पण तो ढिम्म..

तुच खा...मला नाही खायचं

हा पाढा म्हणतो,

मघापासुनची आमची धावपळ व काळपात सर्व वाया जाते.

सारा ऊत्साह मावळतो,तो जेवला नाही म्हणुन आमच्याही पोटात तो मेनु जात नाही..

चिवडा,शेव,फरीयाली,काजु,बदाम,मनुख,शेंगा,बिस्कीट, चॉकलेट,केळ,सफरचंद,चिकु, देवु करतो.पण तो खात नाही.

पुन्हा चार सहा तासात तो विचारतो.

मला खायला काय देतात?

मग आम्ही एकेक नाव विचारतो.

वडा?भजी?पाथरा?सोयाबीन?भुर्जी?आम्लेट?.....

खुप खुप..

पण त्याची नकार घंटा सुरुच.

आणि आमची घालमेल..

मग पुन्हा तो विचारतो.

मला काय देतात?वेगळं काही तरी करा पप्पा

आम्ही पुन्हा हॉटेलातील वेटर सारखं एकेक मेनु विचारतो

शेवटी यादी संपते पण त्याचं

वेगळं काहीतरी

असं पालुपद सुरुच.

आत्ता नावं सांगुन सांगुन तरी काय सांगणार हो?

मग एगप्लेट,दो टांग,व्हिट चिली,चिली वाटर,टनवांगी, हेप्पो,आर्जीभु, जीभं,डावप्लेट अशी चित्रविचित्र व जगाच्या पाठीवर कुणालाच ज्ञात नसलेले मेनु सांगतो.

बायको हताश होवुन उदास होते,

पण असं हिंमत हारेल तो मी कसला?

वेदनांच्या काळ्याकभिन्न मजबुत खडकांना हास्याच्या मुलायम काचांनी फोडण्याचा प्रयत्न करण्यात माहीर असलेला वेडापीर...

मी चटणी पोळीला व्हिट चीली म्हणतो,खुड मिर्चीला चिलीवॉटर संबोधतो,कांदा भजी ला ओनीनय पिझ्झा सांगतो,भाजी भाकरीच्या काल्याला कॉंटीनेंटल बाजरा ब्रेड म्हणतो.,जेणेकरुन ती नावे ऐकुन त्याची भुक चाळवावी.व एखादा पदार्थ मागावा,तो नकार,कच् कच्,नाही,नको,मला नको..अजुन दुसरं सांगा हे सुरु ठेवतो.हळुच मग एखादं नवं नाव सांगतो.

हेप्पौ जॅपॅनीज

ते नाव ऐकुन तो तयार होतो.

मग आम्ही हेपो म्हणजे पोहे बनवतो व ते हेप्पौ म्हणुन खावु घालतो.

लढाई जिंकल्याचा आनंद होतो.

हे रोज दोन्ही वेळचे प्रश्न..





आज त्याने आळु वडी ची फर्माईश केली.

आम्ही फटकन बनवायला घेतली.डाळीचं पीठ भिजलं,आळुच्या पानावर पसरवलं,ते उकळत्या पाण्याच्या वाफेवर ठेवले.

उरकवा पप्पा ,मला भुक लागलीय

त्याचा रट्टा..

आम्ही गॅस वाढवला.त्याचा मुड व भुक आहे तो पर्यंत आळुवड्या व्हाव्यात म्हणुन उतावीळ,,

शेवटी कसं तरी भांडं उतरवलं,वड्या कापल्या

आणि ताट धरुन त्याला वाढणारच तेवढ्यात त्याला फीट येते,त्याच्या पाय झटकण्याने आळुवड्यांचे ताट फिरकवले जाते.घरभर वड्याच वड्या.,आम्ही त्याचे डोळे झापतो.पालथं झोपवतो.थोड्या वेळाने फीट ओसरते.शरीर कंप पावत असते.पुन्हा आम्ही त्याच्या उपाशी पोटाकडे पाहत सुन्न बसतो,पुन्हा ४/६ तासानंतर तो हळुच विचारतो.

मला काय करुन देतात?अस ंविचारतो थांब बेटा तुला आळुवड्या देतो होतसा तो म्हणतो.

नाही आळुवड्या नको..दुसरं ...दुसरं..काही तरी करा

आता दुसरं काय करणार?

मग आयडीया करतो.

अरे आळु वड्या नको का? मग असं करु या ड्यावळुआ करु?

ते नवीन नाव ऐकुन त्याला कुतुहल जागतं.मग आम्ही त्याच वड्या त्याला खावु घालतो. मेनु तोच पण नाव बदलल्याने तो खातो.

आळुवड्या खात नाही ना, मग ड्यावळुआ खा. अशी आयडीया करतो.ते वेगळे नाव पाहुन तो बिच्चारा निरागस ते खातो.केवढे सामर्थ्य असते नावात नाही का?

आमची आयडीया यशस्वी होते.

त्याच्या पोटात दोन घास जातात नि आमच्या मनात समाधान,,केवळ नाव बदलल्याने,,म्हणुन म्हणतो नाम मे भी सबकुछ है भैय...

त्याचच कशाला हो?

आम्हा चांगल्या माणसांचीही हिच तर गोष्ट असते.

नावावर सर्व चालतं.

नावावर खपवतो.

नावाला भुलतो.

नाव गाजवतो,



नावाची मार्केटींग करतो.

नावापुरतं काम करतो.

नाव ठेवतो.

नाव काढतो,

नाव घेतो.

नाव रुपाने ऊरतो.

म्हणुन तर म्हणतो,

छकुबस मे मना..

(नाम मे सबकुछ)

एका कार्यक्रमप्रसंगी आम्ही या पोरांची अशी साथ आम्ही टिपली कॅमेऱ्यात

त्यांचे हे भेटणं कौतुकास्पदच..


अशा लेकरांचे मायबाप झाल्याशिवाय ते कुणाला कसं कळणार?पण आम्हाला ते कळले.आम्हाला त्यांच्या स्वप्नांना सत्यात उतरवायचे आहे.जीवनाच्या या चक्काचौंद जीवघेण्या स्पर्धेत त्यांना उतरावयचे आहे.कोण म्हणतं ते या स्पर्धेत टिकणार नाहीत..छेःते टिकतीलच..त्यांच्या त्यांना न कळणाऱ्या दुर्दम्य इच्छांना आम्हाला मुर्त रुप द्यायचे आहे.निदान त्या आभासी आशेवर तरी आम्हाला जगण्यासाठी हुरुप शोधायचा आहे.

कारण...आम्ही त्यांचे मा...य...बा... प आहोत हो.......!

(संपर्क - ९८५०५९५४२२)

परखड

# शासकिय समाजसेवा



डॉ.ह.ना.जगताप

सोलापूर

साधारण चार/पाच महिन्यांपूर्वीची घटना. एक महिला शिक्षणाधिकारी शाळा अनुदानास पात्र ठरवण्यासाठी आठ लाख रुपयांची लाच घेतांना पकडल्या गेल्या वर्तमान पत्रात जो फोटो छापून आला.त्यावरून त्या खूप वयस्कर वाटत नव्हत्या. साधारणपणे ३५-४० वर्षं वय असावे. म्हणजे नोकरीच्या एवढ्या कमी कालावधीत यांच्याकडे कोट्यावधीची संपत्ती असल्याचे आढळले आहे. अर्थात या काही पहिल्याच अधिकारी नाहीत. दोन वर्षापूर्वी सोलापूर जिल्ह्यातील एका तरूणाची तहसिलदार म्हणून नेमणूक झाल्याची बातमी प्रसिद्ध झाली. व लगेच त्या तरूणाचे गावोगावी सत्कार सुरु झाले. या सत्काराच्या वेळी तो तरुण म्हणत असे की, मला खाजगी कंपनीत मोठ्या पगाराची नोकरी मिळत होती परंतु केवळ देशसेवा करायची म्हणून मी ही नोकरी स्वीकारीत आहे. नेमणूक व रुजु होण्याच्या दोनतीन महिन्याच्या कालावधीत त्याचे हे तुणतुणे चालू होते.

पुढे तो तहसीलदार म्हणून रुजू झाला व एक महीन्या च्या आत पैसे खाल्ले म्हणून पकडला गेला. बहुतेक सर्वजणच ,शासनाच्या प्रशासकीय सेवेत जाणाऱ्यांचे , समाजसेवा व्रताचे गाणे चालू असते. आणि ही मंडळी प्रत्यक्षात किती आणि कशी समाजसेवा करतात हे उपरोक्त उदाहरणांवरून लक्षात येतेच. अगदी सन्माननीय अपवाद वगळता या मंडळींची समाजसेवा जनतेला खूपच महागात पडते हे आपण सर्व जाणतोच. वास्तविक पहाता MPSC किंवा U P SC च्या परीक्षा पास होणारे हे तरुण खरे तर समाजातील बौद्धिकदृष्ट्या cream of the youth असतात .असे असताना व हे सर्व पातळीवरील अधिकाऱ्यांना, पदाधिकाऱ्यांना, आमदार, खासदार, मंत्री यांना माहीत असताना , अशी समाजसेवा करणाऱ्या अधिकाऱ्यांचे प्रमाण अधिकाधिक जोमाने का वाढत आहे हे समजत नाही.

आता तर समाजातील अगदी प्रामाणिक व बुद्धिजीवी लोक देखील असे म्हणत आहेत की, पैसे खाईना कां काम व्हायला पाहिजे. किंबहुना पैसे न खाणारे, नियमाने वागणारे ,अधिकारी शासनाला तसेच आपणा सर्वांनाच नकोसे होवू लागलेत असे वाटते. कोणतेही काम कसेही करून होणे हेच महत्वाचे ठरते आहे. साध्य जितके महत्वाचे तितकेच ते साध्य करण्यासाठीचा मार्ग किंवा साधन हे देखील स्वच्छ शुद्ध व पवित्र असले पाहिजे हा गांधीजींचा साधनशुचितेचा विचार वेडगळपणाचा वाटू लागला आहे. याचे दोन वाईट परिणाम होतात. एक म्हणजे भ्रष्ट अधिकारी गरीब जनतेला नाडतात, शासकीय कामाची गुणवत्ता ढासळते आणि दुसरा महत्वाचा परिणाम म्हणजे प्रामाणिक अधिकाऱ्यांचे मनोबल खच्ची होते. सर्वच अधिकारी भ्रष्ट आहेत अशी समाजाची समजूत बनते व त्यामुळे संपूर्ण शासकीय व्यवस्थेवरचा जनतेचा विश्वास उडून जातो.

वास्तविक पूर्वी एकदा मोहन धारियाजींनी एक विचार मांडला होता. दर पाच वर्षांनी शासकीय अधिकारी व आमदार खासदार यांच्या उत्पन्नाची नोंद घेतली जावी व वाढलेल्या उत्पन्नाचे स्रोत तपासणारी यंत्रणा असावी. परंतु त्यांचे हे विचार तत्कालीन शासनाला व राजकीय नेत्यांना रुचले नाहीत. त्यामुळे तो विचार मागे पडला.आता पुन्हा नव्याने या विचाराची दखल शासनाने घेतली तर कदाचित आमच्या तरुणांची शासकीय समाजसेवा करण्याची उबळ कमी होईल. आज १०० -२०० पदांसाठी लाखो उमेदवार MPSC / UPSC च्या परीक्षेसाठी रात्रंदिवस कष्ट घेतात याचे गुपित हे तर नाही ना !

(संपर्क - ९८२२६१५४६४)

माऊली विशेष!

# मातृहृदयी शिक्षक: साने गुरुजी



किरण दशमुखे
नाशिक

प्रत्येक व्यक्तीच्या जीवनात शिक्षकाची भूमिका अत्यंत महत्त्वाची असते. परिसाच्या स्पर्शाने लोखंडाचे सोने व्हावे त्याप्रमाणे अनेक महनीय व्यक्तिमत्व बालपणी शिक्षकांनी केलेल्या संस्कारानेच पुढे आयुष्यात मोठी झाल्याचे आपणास दिसून येते. महानतेचे बीज हे त्यांच्या मनात लहानपणीच पेरले गेले ते अशा शिक्षकांकडूनच. शिक्षक हा विद्यार्थ्यांच्या मनात बीज पेरणारा महान कृषिवल असतो. डॉ.बाबासाहेब घडले ते त्यांना लहानपणी भेटलेल्या कृष्णाजी केळूसकर या शिक्षकांमुळे. अशी अनेक उदाहरणे देता येतील ज्यांनी जीवने शिक्षकांच्या प्रेमळ स्पर्शाने उजळून निघाले आहेत. शिक्षक हा खऱ्या अर्थाने त्यांच्या भावी जीवनाचा जीवनाला आकार देणारा ठरला आहे. यामुळे व्यक्तीच्या जीवनात शिक्षकाचे स्थान खूप महत्त्वाचे आहे.

या महिन्यात २४ डिसेंबर हा दिवस आपण ‘ साने गुरुजी ’ यांचा जन्म दिन म्हणून साजरा करतो. सानेगुरुजी ही व्यक्ती अतिशय मोठी होऊन गेली आहे. गुरुजींची विद्यार्थ्यां प्रती असलेली तळमळ, सेवा, त्याग या गोष्टींची तुलनाच होऊ शकणार नाही. गुरुजी विद्यार्थी परायण होते. विद्यार्थ्यांप्रति ते सेवा परायण देखील होते. यामुळे अमळनेर येथे तत्वज्ञान मंदिरात अभ्यासासाठी आले असतांना त्यांना अमळनेरच्या छात्रालयात मुलांकडे देखरेख करण्याची जबाबदारी मिळाली.छात्रालयात दूरदूरहुन मुले शिक्षणासाठी येऊ लागली होती. त्यांना छत्रालयात जागा कमी पडू लागली होती. मुले नाराज होत. गुरुजींना हे पाहून वाईट वाटायचे.अशा मुलांना गुरुजी आपल्या खोलीत राहण्यासाठी व्यवस्था करून देऊ लागले. मुले व्हरांड्यात राहण्यासाठी, झोपण्यासाठी तयार असत.मात्र आता गुरुजींना आपली बैठक व्हरांड्यात आणावी लागली होती. गुरुजींच्या खोलीत मुले राहू लागली होती.मुलांचा नेहमी गुरुजींभोवती गराडा असे. गुरुजींनाही याचा कधी कंटाळा आला नाही. ते मुलांशी मायेने प्रेमाने वागत. गुरुजींनी हे सर्व भोगले होते म्हणून त्यांचे मुलांशी वागणे सहृदय होते.ते म्हणायचे ही मुले आई-वडिलांपासून एकटी एवढ्या दूर शिक्षणासाठी आले



आहेत,त्यांचं कोण आहे इथे काळजी घेणारं! आईच्या मायेने त्यांची विचारपूस करणारं! पण गुरुजी खरोखर त्यांच्यावर आईप्रमाणे माया करायचे. सकाळी बिगुल वाजला की मुलांनी उठायचे असा नियम होता. पण एवढ्या पहाटे उठणे मुलांच्या जीवावर येई. मुले काहीतरी कारण सांगून लवकर उठण्याचा कंटाळा करीत.अशा वेळी गुरुजींनी प्रेमाने त्यांना उठवण्याचे

ठरवले. गुरुजी भूपाळी म्हणत म्हणत प्रत्येक विद्यार्थ्याच्या अंथरुणाजवळ जात. त्याला मायेने पाठीवर हात फिरवून उठवत.मुले आनंदाने झोपून झोपेतून जागी होत. लवकर उठून तयारी करत. पुढे हीच मुले म्हणून लागली,  साने सर उठवयला आले की झोप पळून जाते. छात्रालयात दिवसाची सुरुवात प्रार्थना मंदिरात जाऊन होत असे. गुरुजी मुले येण्यापूर्वी सुगंधी ताजी फुले आणून ठेवत. सुगंधी अगरबत्ती लावली जाई. प्रार्थना भजने होत. सकाळची सुरुवात अशी प्रसन्न व आनंददायी होई. काही विद्यार्थ्यांना अद्यापही चांगल्या सवयी लागलेल्या नव्हत्या. त्यांची खोली ही आवरली नसे. अंथरूण पांघरुणाच्या घड्या नीट केलेल्या नसत. गुरुजी अशा मुलांच्या खोलीत जाऊन कुणालाही नकळत हे सर्व आवरून ठेवत. मुले बाहेरून आली म्हणजे हा सर्व व्यवस्थितपणा पाहून चकित होत.गुरुजींनी हे सर्व आवरल्याचे कळले की त्यांना लाज वाटे. ते नंतर स्वतः टापटीपपणाने वागू लागत. काही मुले म्हणत, गुरुजी आम्हाला लाजवण्यासाठी करतात. पण गुरुजी मात्र आईच्या मायेनं हे सारं करायचे. मुले बाहेर खेळावयास गेली म्हणजे गुरुजी त्यांच्या खोल्यातून चक्कर मारत. ज्यांची कंदिलाची काच पुसली नसेल त्यांच्या खोलीतील कंदिलाची काच पुसून स्वच्छ करून ठेवत. गादीवरच्या मळक्या चादरी कळकट कपडेदेखील गुरुजी धुवून वाळत घालीत. मुलांनी हे पाहिले की त्यांना स्वतःचीच लाज वाटे. साने सरांना हे करावे लागले याची त्यांना खंत वाटे.ते अधिकाधिक स्वच्छतेची टापटीपपणाची काळजी घेऊ लागले. छात्रालय हेच गुरुजींचे घर आणि त्यातील विद्यार्थी हेच गुरुजींचा गोतावळा होता. गुरुजी मुलांमध्ये रमून गेले होते. घर-दार सोडून आलेल्या मुलांना आईच्या मायेने वागवायचे. त्यांची जेवणाखाण्याची काळजी घ्यायचे.गुरुजींना कोणी काही दिले तर ते मुलांमध्ये वाटून द्यायचे. मुख्याध्यापक गोखले सर यांच्या पत्नी कधी काही चांगले केले की गुरुजींना देऊन पाठवत. गुरुजी ते सर्व मुलांमध्ये वाटून खात. एकट्याने खाऊ नये अशी शिकवण गुरुजी आपल्या वागण्यातून मुलांना देत होते. यामुळे विद्यार्थी व गुरुजी यांच्यामध्ये दुरावा राहिला नव्हता. एका अपार स्नेहाच्या धाग्याने त्यांचे बंध जोडले गेले होते.

एकदा गुरुजी विहिरीवर कपडे धुवायला गेले होते.छात्रालयातील मुले गुरुजींच्या खोलीत आली. खोलीत गुरुजी नव्हते. गुरुजींचा लेखनाचा डेस्क, कागद,वह्या-पुस्तके तेवढी पडली होती. त्यांच्यातील तडवी नामक मुलाचे लक्ष गुरुजींच्या मृगजीनाकडे गेले. गुरुजी ज्या मृगजीनावर बसत ते खूपच जीर्ण झाले होते. त्याला काही ठिकाणी छिद्रे पडली होती. तडवी ने ही बाब हेरली.त्याने मनात ठरवले, गुरुजींना नवीन मृगजीन आणून द्यायचे. तो सातपुड्यातील आदिवासी जमातीतील मुलगा होता. त्यांच्याकडे परंपरेने शिकार केली जात असे. एकदा घरी सुट्टीमध्ये गेला असताना त्याने जंगलातून एका काळविटाची शिकार केली. त्याला मारून त्याचे कातडे म्हणजे मृगजीन काढले. हे सर्व अर्थातच त्याने गुरुजींच्या मायेपोटी केले होते. तो छात्रालयात आला. त्याने मधल्या सुट्टीत गुरुजींच्या जागी जुने मृगजीन काढून नवे सुंदर मृगजीन टाकून ठेवले. गुरुजी बाहेरून आले. एवढे सुंदर मृगजीन पाहून त्यांना खूप आनंद वाटला.पण क्षणभरच. जेव्हा त्या विद्यार्थ्याने काळविटाची शिकार केल्याचे सांगितले,तेव्हा गुरुजींचे कोमल हृदय हेलावले.ते त्या मुलाला म्हणाले,अरे अरे, केवढे वाईट केलेस.मला बसण्यासाठी मृगाजिन मिळावे म्हणून तू त्या मृगाला ठार केले, हे चांगले केले नाही. केवढा आनंदाने बागडणारा उड्या मारणारा हा प्राणी त्याचे तू जीवन संपवले. कुणाच्या जीवनाचा अशाप्रकारे घात करणे चांगले नाही. त्या प्राण्याला निसर्गतः मरण आले तरच त्याचे मृगाजिन घ्यावे. आपल्या आनंदासाठी प्राण्यांचा असा बळी घेऊ नये. एवढ्या सुंदर मृगाला तू त्याचे जीवन संपण्यापूर्वीच संपवले.गुरुजी बोलत असताना गहिवरले होते. त्यांच्या डोळ्यात अश्रू उभे राहिले. तडवीची मान देखील खाली झाली होती. त्याचेही डोळे अश्रूंनी भरून आले होते. छात्रालयातील सर्व विद्यार्थी हे पहात होते.मृगाजिन या पुस्तकात साताऱ्यातील माजी विद्यार्थी कै.ब.ग. कुलकर्णी आपल्या आठवणी सांगताना म्हणतात, त्या दिवसापासून मुक्या प्राण्यांवर प्रेम करण्याची आयुष्याची शिकवण आम्हा सगळ्या मुलांच्या हृदयावर कायमची कोरली गेली.

छत्रालयाची इमारत गावाबाहेर होती.यामुळे तेथे आजूबाजूला ओसाडपणा फार होता. सभोवताली काटेरी झुडपे होती. पडीत जागा असल्याने सरपटणारे प्राणी वस्ती करत. या जागेला लोक ‘ अंदमान’ म्हणायचे. पण गुरुजींनी या जागेला ‘नंदनवन’ करण्याचे ठरवले.त्यांना लहानपणापासूनच फुल झाडांची आवड होती. मुलांना घेऊन त्यांनी या जागेची स्वच्छता केली. खाच-खळगे बुजवून टाकले.समतल जमिनीची मशागत करून वाफे तयार केले. यामध्ये सुंदर सुंदर फुलांची रोपे लावली. विहिरीच्या पाण्यावर ही बाग फुलवली.

रात्री सगळे काम संपले,मुले झोपी गेली की गुरुजी विहिरीवरून दोन्ही हातात दोन बादल्या पाणी भरून आणत. बागेला शिंपत. मुलांवर आणि फुलांवर गुरुजींचे सारखेच प्रेम होते. फुलांच्या प्रमाणेच मुलांचे जीवन घडावे अशी गुरुजींची दृष्टी होती. हात फिरे तिथे लक्ष्मी म्हणतात, त्याप्रमाणे हळूहळू त्या ओसाड जागेत बाग बहरू लागली. रोपे चांगली बहरू लागली. एक दिवस तर गुलाबाला कळी आलेली पाहून गुरुजी खूप आनंदले. उमलणाऱ्या पहिल्या फुलाचा वाढदिवस चक्क त्यांनी विद्यार्थ्यांसमवेत साजरा केला. यावरून गुरुजींचे फुलांच्या प्रती असलेले प्रेम दिसून येते. मुलांवर एवढे निस्सीम प्रेम करणाऱ्या गुरुजींचे अंत:करण देखील फुलासारखेच कोमल होते. या गोष्टीची प्रचिती आपणास गुरुजींच्या अनेक प्रसंगातून दिसून येईल.

छत्रालय म्हणजे गुरुजींचे आनंदनिधान बनले होते. गुरुजींच्या मनातील आदर्श समाजाची कल्पना ते इथे प्रत्यक्षात रुजवू पाहत होते. उद्याचा नवा भारत एक प्रकारे गुरुजींच्या छात्रालयात घडत होता. तिथे गुरुजी सर्वांना समतेची शिकवण देत होते. जातीभेद, श्रेष्ठ-कनिष्ठ ही भावना येथे कुणाच्याच मनाला स्पर्श करीत नसे. सारे जेवताना एका रांगेत मांडीला मांडी लावून बसत. जातिभेदाचा प्रश्नच नव्हता. सर्वच समानतेने वागत होते. छात्रालयातील हे वातावरण गुरुजींना आपल्या कार्याचा आनंद देणारे ठरत होते.गुरुजी अनेक मुलांचे आई-वडील दोन्ही झाले होते. एक कृतार्थता ते अनुभवत होते.

अमळनेरच्या या शाळेत आल्यावर गुरुजींमधील खरा शिक्षक गवसला. त्यांनाही मुलांसोबत शिकण्यात, शिकवण्यात खरा आनंद मिळू लागला. हेच आपल्या जीवनाचे सार होते याची कृतार्थता गुरुजींना वाटू लागली. मुलांना शिकवण्यात त्यांना खरा आनंद मिळू लागला होता.इतके दिवस जीवनाचा उबग आलेले गुरुजी मुलांमध्ये आनंदी व उत्साही दिसू लागले होते.मात्र आपण एम्. ए. असलो तरी आपल्या जवळ शिक्षणशास्त्रातील पदवी नाही, शिक्षकाचे प्रशिक्षण नाही याची खंत त्यांच्या मनाला कायम वाटत असे. प्रत्यक्षात मात्र गुरुजी प्रशिक्षित शिक्षकाहूनही उत्तम दर्जाचे शिकवीत असत. पण गुरुजींचा स्वभाव मुळातच अतिशय प्रामाणिक असल्याने त्यांना ही खंत वाटत असे. गुरुजी जेव्हा अमळनेरला हायस्कूलात आले, तेव्हा त्यांना सुरुवातीला पाचवीला इंग्रजी व संस्कृत आणि सहावीला मराठी हे विषय शिकविण्यास सांगण्यात आले. गुरुजींचे तर हे तिनही विषयांवर सारखेच प्रिय होते. माय मराठी वर त्यांची नितांत प्रेम होते. मात्र इंग्रजी हे वाघिणीचे दूध आहे असे चिपळूणकर यांनी म्हटल्याप्रमाणे त्यांनी इंग्रजी वांडमयाचे ही वाचन भरपूर केले होते.इंग्रजी साहित्यातील श्रीमंती मराठी साहित्यात आली पाहिजे यासाठी त्यांनी पुढे अनेक इंग्रजी पुस्तकांचे मराठीत अनुवाद देखील केले आहेत. इतिहास हा तर गुरुजींचा आवडता प्रांत होता. पाठ्यपुस्तकातील इतिहास थोडक्यात असे.गुरुजी मात्र मुलांना हा इतिहास सखोलपणे उलगडून सांगत.त्यांना एवढे ज्ञात होते की हातात पुस्तक घेण्याची गरज सहसा पडत नसे. गुरुजी वर्गात कधी खुर्चीवर बसले नाहीत. शिकवताना टेबलाच्या पुढे मध्यभागी टेकून उभे राहत आणि प्रभावीपणे शिकवत असत. मुले एवढी सारी माहिती ऐकून मंत्रमुग्ध होऊन जात. गुरुजींचे ज्ञान पाठ्यपुस्तका पुरते कधीच बंदिस्त नव्हते.

गुरुजींचे राहणीमान साधे होते. पण विचारसरणी उच्च होती. त्यांचे अंतरंग अधिक स्वच्छ व प्रकाशमान होते. ज्यांचे अंतरंग शुद्ध असते त्याला बाह्यरंग दाखविण्यात फारसा आनंद वाटत नाही. तसेच काहीसे गुरुजींचे होते. गुरुजी वर्गात शिकवायला जाऊ लागले की प्रारंभी मुले त्यांचा शांत स्वभाव पाहून गर्दी गोंगाट करीत. मात्र लवकरच गुरुजींची रसाळ वाणी जशी वर्गात प्रकट होऊ लागली तशी मुले शांत झाली. पुढे पुढे तर गुरुजींच्या तासाला एवढी शांतता असे की वर्गात पिन पडली तरी आवाज येईल. इतर शिक्षकांना गुरुजींच्या या शिकविण्याचे मोठे कौतुक वाटू लागले.गुरुजी मुलांवर अशी काय जादू करतात, ही खोडकर मुले त्यांच्या तासाला एकदम गप्पगार होतात. मंत्रमुग्ध होऊन ऐकत राहतात. काही शिक्षकांनी गुरुजींना त्यांच्या तासाला बसू देण्याची पाठ निरीक्षणाची विनंती केली. पण गुरुजींनी त्यांना सपशेल नकार दिला. लहान मुलांमध्ये सहजपणे मिसळून जाणारे गुरुजी मोठ्यांमध्ये सहजपणे मिसळत नसत. त्यांचा स्वभाव लाजाळू होता. तरीही एकदा गुरुजी आपल्याला वर्गात त्यांचे शिकवणे पाहण्याची परवानगी देत नाहीत म्हणून काही शिक्षक चोरून वर्गाबाहेर त्यांचे शिकवणे ऐकत होते. ही गोष्ट गुरुजींच्या लक्षात आल्यावर त्यांनी शिकववणे बंद केले आणि ते वर्गातून बाहेर निघून गेले. कोणाला गुरुजींची ही कृती विक्षिप्त वाटेल. पण गुरुजी स्वभावतः खूप लाजाळू होते. त्यांना स्वतःमध्येच रमायला आवडे.मुलांशी काय ते तेवढे मोकळेपणाने प्रकट होत. गुरुजी खरेच खूप मोठे होते. त्यांचेही मोठेपण मान्य व्हायला पुढे बराच काळ जावा लागला.

गुरुजी केवळ पाठ्यपुस्तकातीलच माहिती मुलांना देत नसत तर त्याला अनुषंगीक माहिती ते विविध संदर्भ पुस्तके मिळवून शोधून काढत. ती मुलांपुढे ठेवत. अध्यापन करण्यापूर्वी स्वतः तयारी करत. पाश्चात्त्य देशांचा इतिहास शिकविताना त्या त्या देशातील विचारवंतांची माहिती शोधून मिळवीत व ती विद्यार्थ्यांना सांगत. इंग्लंडचा इतिहास शिकविताना ग्लॅडस्टन, डिझरायली यांच्या विषयी विविध ग्रंथांतून माहिती जमा करत.मुलांना ती माहिती सांगत गुरुजी मुलांना म्हणायचे, तुम्ही एवढे सारे पुढे वाचाल कि नाही माहित नाही, यामुळे आत्ताच सांगून ठेवतो. आताच काय ते शिकायचे ते शिकून घ्या. शिक्षकामधला विद्यार्थी नेहमी जागा असला पाहिजे हे गुरुजींच्या वागण्यातून दिसत होते.आज किती शिक्षक पूर्वतयारी करून वर्गात जातात. पुस्तका बाहेरचे जग किती प्रमाणात मुलांपुढे उभे करतात. गुरुजी वाचनालयातील पुस्तके घेऊन फावल्या वेळात देखील वाचत असत. रेल्वेच्या प्रवासात देखील नेहमी पुस्तके त्यांच्या सोबत असत. साने गुरुजी हे प्रतिभावंत शिक्षक होते. त्यांना सर्वसामान्य शिक्षकांप्रमाणे शिक्षणक्रमाची गरज नव्हती.त्यांना शिकविण्यासाठी चे कृत्रिम बंधने मान्य नव्हते. ते मुक्तपणे विद्यार्थ्यांना ज्ञान देण्याचे काम करीत होते. त्यांच्या ज्ञानाला चौकट घातलेली नव्हती. चौकटीबाहेर व चाकोरीतून बाहेर पडून शिकवणे यावर त्यांचा भर होता. किंबहुना ते तसे ठरवून करीत होते असे नव्हे तर तो त्यांचा पिंडच होता.पण केवळ चाकोरीतून चालणाऱ्यांना गुरुजींची हे विशाल मन कसे कळणार?

एकदा शाळा तपासणीसाठी साहेब आले होते. ते गुरुजींच्या वर्गात तपासणीसाठी गेले. गुरुजी आपले नेहमीप्रमाणे शिकविण्यात रंगून गेले होते. वेळापत्रकाप्रमाणे त्या वर्गावर तो तास संस्कृत विषयाचा होता. मात्र गुरुजी मराठी शिकवीत होते. पाठ घेण्याच्या शिक्षणशास्त्राच्या नियमानुसार फळ्यावर पाठाचे नाव लिहिलेले नव्हते. कोणता विषय शिकवत आहेत हे लिहिलेले नव्हते. त्यामुळे साहेब थोडे नाराज झाले.त्यांनी मुख्याध्यापक गोखले यांना याविषयी तक्रार केली.गोखले सर म्हणाले, साने सर संस्कृत व मराठी हे दोन्ही विषयी त्या वर्गाला शिकवतात. मराठीची आशयाची काही मागणी असेल म्हणून त्यांनी हा संस्कृतचा तास देखील मराठीसाठी दिला असेल.

त्यांनी साहेबांना समजून सांगण्याचा प्रयत्न केला.त्यांनी साने हे कळकळीने शिकवणारे शिक्षक असून ते खूप अभ्यासू तर आहेतच पण भावनाप्रधान देखील आहेत असे सांगितले. गुरुजींची शिक्षक या व्यवसायाकडे पाहण्याची वृत्ती विशाल होती. तसेच तथाकथित रूढ परंपरागत शिक्षण पद्धतीपेक्षा वेगळी पद्धती त्यांनी स्वीकारली होती. परीक्षेपुरता अभ्यास असे त्यांना मान्य नव्हते. शिक्षणातून मुलांचा सर्वांगीण विकास व्हावा. ते पुढे जीवनात स्वत:च्या पायावर उभे राहावेत. स्वावलंबी बनावेत हा विवेकानंद यांचा शिक्षण विचार त्यांच्या ठायी होता.

गुरुजी स्वतः शिस्तीचे भोक्ते होते. एकदा शाळेत यायला काहीतरी कारणास्तव त्यांना पाच मिनिटे उशीर झाला. या गोष्टीचे त्यांना फार वाईट वाटले. त्यांनी त्याबद्दल वरिष्ठांना एक चिठ्ठी लिहून क्षमा मागितली. मेणाहून मऊ असणारे गुरुजी तत्वासाठी मात्र वज्राहून कठीण होते.एकदा असाच एक प्रसंग घडला होता. मामलेदार साहेबांचा मुलगा गुरुजींच्या वर्गात शिकत होता. मात्र त्याचे म्हणावे तसे अभ्यासात लक्ष नव्हते. गुरुजींनी त्याच्या वहीवर शेरा मारला.weak in study. ही गोष्ट मामलेदार साहेबांनी बघितली. ते रागावले. त्यांनी लिहिले, मुलगा शाळेत येतो तर शिक्षक काय करतात?

गुरुजींनी या प्रश्नाला उत्तर पाठवले.मुलगा फक्त सहा तास शाळेत असतो आणि बाकी वेळ तो घरीच असतो.तेव्हा पालक काय करतात?

गुरुजींना हे माहित होते आपण मुलांसाठी किती मेहनत घेत आहोत ते. यामुळे त्यांना इतर कुणाला सांगण्याची गरज नव्हती.जेव्हा आपण एखादे काम निष्ठेने करीत असतो तेव्हा त्याबद्दल बोलण्याचा अधिकार त्याला तयार होत असतो. असाच अधिकार मला वाटते गुरुजींना आलेला होता. गुरुजींच्या काव्यातून ते सहजपणे व्यक्त देखील झाले आहे.गुरुजी म्हणतात,

असे जे आपणापाशी । असे जे वित्त वा विद्या ।।
सदा ते देतची जावे । जगाला प्रेम अर्पावे ।।

**संपर्क– ९४२०८८९५७५**

# खारीचा वाटा



डॉ.मेघश्री दळवी
मुंबई

गोष्ट आहे १९७२ ची. बिली बार हा एक तरूण बदल म्हणून अमेरिकेतील कोलोरॅडोमधल्या गोथिक पर्वताच्या पायथ्याशी राहायला आला. रॉकी माऊंटन म्हणजे सुमारे पाच हजार किलोमीटर लांबीच्या खडतर पर्वतरांगा. त्यातला हा एक पर्वत त्याने निवडला त्यामागे काही खास उद्देश नव्हता. ताण-तणावातून थोडे दिवस सुटका, थोडा बदल, एवढा साधासा त्याचा विचार होता.

त्या वर्षी हिवाळा सुरू झाला आणि त्या कडाक्याच्या थंडीत बिलीला एकट्याने कंटाळा आला. सहज गंमत म्हणून त्याने किती बर्फ पडला त्याची नोंद आपल्याकडच्या वहीत केली. दुसऱ्या दिवशीही त्याने परत बर्फाची पातळी मोजली. सोबत बर्फात उमटलेल्या प्राण्यांच्या ठशांचीही नोंद केली. त्याला हे काम आवडलं. काहीतरी वेगळं आणि थोडंसं मजेदार.

एकट्याने राहत असताना त्याला बाकी काही उद्योग नव्हता. तेव्हा याच नोंदी नियमित घ्यायचं त्याने ठरवलं. हिवाळा संपत आला तेव्हा बर्फ पहिल्यांदा कधी वितळला, वसंत ऋतुमधलं पहिलं फूल कधी फुललं, कोणकोणते प्राणी जवळून गेले, कोणत्या पक्ष्यांचे आवाज ऐकले - असा त्याच्या नोंदींचा पसारा वाढला.

कुणास ठाऊक कसा, पण बिली तिथेच राहिला. माणसांची वर्दळ नाही, स्वच्छ हवा, गरजेच्या गोष्टी मिळवायला कठीण नाही, असा तो परिसर त्याला आवडला. बिलीचा मुक्काम वाढला तसा त्याने आपला नोंदी घेण्याचा दिनक्रम तसाच पुढे सुरू ठेवला. बघताबघता त्याच्याकडे भरपूर डेटा जमा झाला. कुतूहल म्हणून तो वेगवेगळ्या वर्षांच्या नोंदींची तुलना करायला लागला. यावर्षी बर्फ लवकर वितळला, मागच्या वर्षी तापमान खूपच खाली गेलं होतं, कोल्हे-बीव्हर यासारख्या प्राण्यांचा वावर या वर्षी जास्त झाला, अशी माहिती तो त्या नोंदींमधून मिळवायला लागला. हळूहळू त्याच्या या अभ्यासाला खूप नेटका आकार येत गेला.

जवळच रॉकी माऊंटन बायोलॉजिकल लॅब होती. तिथल्या काही संशोधकांशी बिलीची तोंडओळख होती. त्यापैकी एकाशी एक दिवस बिलीने आपल्या डेटाचा विषय काढला. ते वर्ष होतं १९९०, म्हणजे त्याने नोंदी ठेवायला सुरुवात केल्यापासून अठरा वर्षांनी! अर्थात डेटा, त्याचं महत्त्व, अशा गोष्टींचा विचार बिलीने केला नव्हता. आपल्याला आनंद मिळणारं काम या दृष्टीने फक्त तो त्याच्या नोंदींकडे पाहत होता.



या प्रयोगशाळेत काही संशोधक फुलं, वनस्पती यांच्यावर संशोधन करत होते. त्यांना बिलीच्या डेटाविषयी उत्सुकता वाटली. त्यांनी आपल्या संशोधनाचा काही वर्षांचा डेटा आणि बिलीचा डेटा यांची तुलना करून बघितली आणि एक मोठा खजिनाच गवसल्यासारखं झालं त्यांना!

गोथिक माऊंटन परिसराचा इतका सखोल, सर्वांगीण डेटा तोवर कोणीच मिळवला नव्हता. बिलीने विशिष्ट अभ्यासाचा हेतू मनात न ठेवल्याने त्याच्या डेटाला अनेक परिमाणं होती

आणि ती संशोधकांसाठी खूप महत्त्वाची होती. या परिसराचं हवामान बदलत गेलेलं या डेटावरून पुरेपूर स्पष्ट होत होतं. बर्फाचं प्रमाण, तापमानातले चढ-उतार यांचे ट्रेण्ड्स अनपेक्षितपणे संशोधकांच्या हातात पडले होते.

ग्लोबल वॉर्मिंग, हवामानातले बदल, पाऊस आणि बर्फवृष्टी यांचं बदललेलं वेळापत्रक, या बदलांचा एखाद्या परिसरातल्या वनस्पती आणि प्राणी-पक्षी यांच्यावर झालेले परिणाम, या सगळ्याचा अभ्यास तसा अलीकडेच सुरू झाला. त्यामुळे थेट १९७२ पासूनच हा डेटा मिळाल्याने संशोधकांच्या कामाला आपोआपच एक वेग मिळाला, एक निश्चित दिशा मिळाली.

कधी कधी कोणी एकांडा शिलेदार कल्पनेपलिकडचं काम करून जातो, याचं बिली बार हे उत्तम उदाहरण आहे. हवामानशास्त्राचा अभ्यासदेखील कधी न केलेल्या बिली बारने या शास्त्रात खरोखरीच खूप महत्त्वाची भर घातली आहे. बिलीचा खारीचा वाटा आज या संशोधानात अतिशय मोलाचा समजाला जातो.

नंतर मग बिलीने संगणकाचा वापर सुरू केला. आताही तो नोंदी घेतो, पण संगणकावर. त्याची स्वत:ची वेबसाइट आता आहे. तिथे तो गोथिक माऊंटनचं हवामान, तिथले फोटो, कोणते प्राणी दिसले, महिन्याच्या नोंदी अशी माहिती देतो. हे काम निदान २०२२ पर्यंत करून त्याला एकूण पन्नास वर्षांच्या नोंदी एकहाती ठेवायच्या आहेत. बिली बार याची वेबसाइट: http://www.gothicwx.org/

**संपर्क- ९८२०१४४६५७**

## नाविन्यपूर्ण ॲप

### फिटनेसचा डोस अर्धा तास रोज

फिट म्हणजेच तंदुरुस्त राहणे सोपे आहे. मोफत आहे आणि आजच्या धावपळीच्या जीवनाची सर्वात महत्वाची गरजही आहे. अशावेळी असा एक विश्वासार्ह साथीदार आपल्या सोबत असेल जो आपले भोजन किती ग्लास पाणी प्यायचे,आपले वजन आणि झोप यासारख्या आवश्यकता अधिक चांगल्या पद्धतीने हाताळू शकत असेल तर याहून सर्वोतम काय असू शकेल? यासाठी फिट इंडिया ॲप सुरु करण्यात आले. केंद्रीय क्रिडा आणि युवक कल्याणमंत्री अनुराग सिंग ठाकूर यांनी मेजर ध्यानचंद यांच्या जन्मदिनी २९ ऑगस्ट रोजी यांची सुरुवात केली.हे ॲप म्हणजे तंदुरुस्ती बाबत जागरुकता निर्माण करणाऱ्या फिट इंडिया चळवळीचा दुवा आहे. ज्यांची सुरुवात पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी 'फिटनेसचा डोस अर्धा तास रोज या मूलमंत्राने केली होती.

### असे करा डाऊनलोड

हे ॲप अँड्रॉईड आणि आयओएस दोन्ही मंचावर हिंदी आणि इंग्रजीत उपलब्ध आहे आणि हे मोफत आहे.फिट इंडिया मोबाईल ॲप मोबाईलच्या मदतीने तंदुरुस्तीची पातळी तपासण्याची सुविधा देतो.यामध्ये तंदुरुस्तीच्या पातळीची नोंद तपासणे,आपण किती पावले चाललो याचा मागोवा घेणे,झोपेचा मागोवा घेणे,कॅलरीच्या मात्रेचा आढावा घेणे,योग्य आहार घेणे इ.गोष्टी अंतर्भूत आहेत.यात ॲनिमेटेड व्हिडीओ आणि वैयक्तिक विशिष्ट गरजा पूर्ण करणाऱ्या 'मेरी योजना' सारखी काही अद्वितीय वैशिष्ट्ये आहेत.

लक्षात ठेवण्यासाठी लोक प्रति तासाच्या हिशोबाने सेटिंग करु शकतात आणि वेळोवेळी त्यांच्या तंदुरुस्तीची पातळी आणि दैनंदिन उपक्रमांच्या प्रगतीविषयी माहिती मिळवू शकतात.तंदुरुस्ती आणि जीवनशैलीत बदल करण्यास लोकांना प्रेरित करण्यासाठी लोक त्यांच्या तंदुरुस्तीविषयक आणि उपक्रमांची माहिती इतरांशी सामायिक करु शकतात.

## पुस्तक परिक्षण

# गुरुजी,तू मला आवडला.




विजया हिरेमठ


सांगली


शिक्षणाची गगनचुंबी इमारत उभी करण्यासाठी सर्वप्रथम त्या इमारतीचा पायाच मजबूत असणं महत्वाचं आहे. मुलांच्या प्राथमिक शिक्षणाच्या भक्कम पायावरच त्यांची शैक्षणिकच नव्हे तर यशस्वी आयुष्याची इमारत उभी केली जाते.जन्माला येताना जशी बाळाची आईशी नाळ जोडलेली असते अगदी तशीच मुलाच्या शिक्षणाची नाळ त्याच्या शिक्षकांशी जोडलेली असते.बाळाच्या जन्माच्या वेळी त्याची नाळ आईपासून अलगद,हळूवारपणे विलग केली जाते,त्याप्रमाणे मुलांच्या भावनांना धक्का लागू न देता त्यांची शिक्षणाची नाळ हळुवार जोडता आली तर शिक्षणासोबतच मुलांचा प्रवास हा नक्कीच सुखकर ,आनंददायी व चिरंतर टीकणारा ठरेल.

'गुरुजी,तू मला आवडला' पुस्तकाच्या या नावातच हे पुस्तक म्हणजे लाडक्या गुरुजींच्यासोबत शिक्षण प्रवास आरंभलेल्या लेकरांच्या आनंददायी शिक्षणाचा सोहळाच असावा असं वाटलं. लेकरांकडूनच गुरुजींना तू मला आवडला अशी मायेची पोचपावती मिळणं म्हणजे खरंच एक शिक्षक म्हणून लेखक युवराज माने यांचा हा मोठा सन्मानच आहे.एका शिक्षकाने आपल्या विद्यार्थ्यांसोबत अनुभवलेला प्राथमिक शिक्षणाचा आनंदमेळा ,एक लेखक म्हणून मनात टिपून ठेवला आणि त्याच शिक्षणाचा सोहळा आपल्या पुस्तकाच्या माध्यमातून अतिशय सुंदर शब्दांत मांडला आहे.

मुलं प्रथमच शाळेत येताना बावरतात,घाबरतात. त्यांना घरातील सुरक्षित वातावरणातून शाळेच्या अनोळख्या वातावरणात रमण्यासाठी आपलसं काही आणि आपलसं कोणी जवळ हवं असतं.आणि नेमकी हीच भूमिका युवराज माने सरांनी अतिशय चोख बजावली आहे. घरात जशी आई असते तसेच शाळेत शिक्षक आईची जागा भरून काढणारे असतील तर मुलांना शाळेत आनंदाने रुळायला वेळ लागत नाहीच. मुलं,घर,शाळा ,आजूबाजूचा परिसर यांना एका नाजूकश्या पण तितक्याच घट्टपणे बांधल्याचे जाणवते.

शिक्षण म्हणजे केवळ पुस्तकी ज्ञान संपादन करणे नसून अनुभवातून,आजूबाजूला घडणाऱ्या घटनांतून मुलांच्याही नकळत देता येईल असा एक ठेवाच.मुलांना लहान वयात आपण




जितके जास्तीत जास्त नवनवीन अनुभव देऊ तितकी त्यांची मेंदूची वाढ चांगली होते असे तज्ञ लोकांचे म्हणणे आहे.आणि हेच वेगवेगळे अनुभव युवराज माने सरांनी आपल्या शाळेतील मुलांना देऊन मुलांना शिक्षण प्रवाहात कसे घडवले व स्वतः एक शिक्षक म्हणून त्यातून कसे घडतं गेले.याचंच वर्णन सहज,सुंदर,सोप्प्या भाषेत आपल्या 'गुरुजी,तू मला आवडला' या पुस्तकातून आपल्या भेटीस आणलं आहे.लेखकांनी या पुस्तकात तब्बल ७० पेक्षा जास्त लेखातून स्वतःचे अनुभव अतिशय मोजक्या पण प्रभावी भाषा शैलीतून आपल्यासमोर मांडले आहेत.या पुस्तकांत लिहलेला प्रत्येक उपक्रम त्यांच्या शाळेतील मुले,त्यांच्या गरजा,आवडी-निवडी लक्ष्यात घेऊन मुलांना सहज,आनंददायी शिक्षणाची अनुभूती देणारा असून

प्रायोगिक तत्त्वावर हे उपक्रम राबवताना शिक्षक स्वतःच माझ्या मुलांनी मला घडवलं हे मोठ्या मनाने मान्य करतात याचे विशेष कौतुक वाटले.' शिक्षक विद्यार्थी घडवतो असे म्हणतात पण इथं तर विद्यार्थ्यांनी एक शिक्षक घडवला. एक आनंदाची डहाळी बनू इच्छिणाऱ्या शिक्षकाला या आनंदाच्या झाडाने ती संधी दिली आणि मग माने सरांसारखा उत्साही ,प्रयोगशील , संवेदनशीलशिक्षकाच्या आनंदाच्या डहाळीवर मनसोक्त झुलण्याचे, शिकण्याचे भाग्य या पाड्यावरील लेकरांना लाभलं. शाळा म्हणजे बंदीवास नसून इथेही मज्जा आहे की हा विश्वास मुलांना मिळाला आणि मग हे आनंदाचं झाड कसं कसं बहारायला लागलं याचं सुरेख वर्णन लेखकांनी या पुस्तकांत केले आहे.मला तर पुस्तक वाचताना असं वाटलं की कोणतंही पान काढावं,कुठूनही सुरवात करावी आणि आलिबाबाच्या गुहेप्रमाणे या पुस्तकाच्या प्रत्येक पानांतून मुलांच्या हसत खेळत शिक्षणाच्या खजान्यापर्यंत पोहचता येत.

कधी खेळातून, कधी चित्रातून,कधी घरातील टाकाऊ वस्तूंच्या माध्यमातून,कधी आपल्याच घरातील आजी-आजोबा, आई-बाबा, पाळीव प्राणी,निसर्गाच्या सानिध्यात राहून झाडे,वेली, पशुपक्ष्यांच्या सोबतीतुन मुलांचे शिक्षण कसे सुरू करता येते याचा राजपथच लेखकाने पुस्तकातुन सर्वांसाठी रेखिला आहे,खुला केला आहे.

मुलांच्या भावना,अपेक्षा ,इच्छा ,हट्ट या साऱ्यांचा आदर करत एक शिक्षक मुलांशी कसं अतूट प्रेमाचं नातं जोडू शकतो, याचे अनेक दाखले पुस्तकातील अनेक प्रसंगातून डोळ्यासमोर जसेच्या तसे उभे राहतात. पुस्तकातून आपल्यालाही अनेक व्यक्तिरेखा,अनेक झाडे-वेली,पशु-पक्षी,कीटक,विविध प्रकारचे ममनोरंजक खेळ,खेळाची मुलांनी स्वतःच्या हाताने बनवलेली साधने यांची ओळख तर होतेच शिवाय आपण या मुलांच्या विश्वात असे काही रममाण होऊन आपल्याच बालपणात हरवून जातो की पुस्तक खाली ठेवायची इच्छाच होतं नाही.पाठय पुस्तकातील अध्यापनासोबतच व्यावहारिक ज्ञानाचे,भावनिक व काल्पनिक विश्वाचे भांडार मुलांसाठी खुले करताना सरांनी केलेल्या अनेक प्रयोगांचे कौतुक करावे तितके थोडेच आहे.निसर्गाच्या सानिध्यात मुलांचे कुतूहल जागृत करत आणि तितक्याच सक्षमतेने त्यांच्या अनेक प्रश्नांची उत्तरे शोधून काढण्यासाठी माने सरांनी केलेले प्रयोग आणि मुलांना शिक्षण प्रवासात टिकून राहण्यासाठी वारंवार दिलेले प्रोत्साहन यातून संकलित झालेल्या अनुभवांची शिदोरी म्हणजे 'गुरुजी,तू मला आवडला' हे पुस्तक... शंख,शिंपले, दगड, गोटे,पानं-फुलं, बिया यांच्या माध्यमातून शिक्षण ,चित्रातून मुलांचे कल्पना विश्व उलगडू पाहणे,बी रुजण्यापासून झाड उगवेपर्यंतचा प्रवास पुस्तकातील चित्रातून शिकवण्यापेक्षा प्रत्यक्ष कृती आणि निरीक्षणातून मुलांना या शिक्षणाची अविस्मरणीय अनुभूती देणे आणि त्यातून निर्माण होणाऱ्या मुलांच्या भावमुद्रा टिपून त्याचंही संकलन करण्याचे गोड अनुभव लेखकाने रंजकपणे नमूद केले आहेत. मराठी,गणित, विज्ञान किंवा इंग्रजी असो प्रत्येक विषय शिकवताना केलेले अनेक प्रयोग तसेच मुलांना वाचन -लेखनाची गोडी लागावी म्हणून राबवलेले उपक्रम असो किंवा समानता,एकता, आपुलकी,प्रेम,जिव्हाळा या भावनांची पेरणी करण्याचे उपक्रम असो लेखकाने विविधांगी अश्या सगळ्याच आवश्यक कृती आणि अनुभव सगळंच शब्दबद्ध केले आहे.

सोबतच मा.भाऊ गावंडे या प्रतिभावंत व्यक्तिमत्वाची लाभलेली प्रस्तावना पुस्तकाच महत्व अधोरेखित करते. मुलांसाठी व पालकांना सतत जागृत ठेवणारे मासिक म्हणजे 'वयम'! या मासिकेच्या संपादिका मा.शुभदा चौकर यांनी पुस्तकाची केलेली पाठराखण म्हणजे एका संपादकांची दूरदृष्टीचं...!

जितक्या सहज पण उत्साहात माने सरांनी हे सारे प्रयोग , उपक्रम शाळेत राबवले तितक्याच चिकित्सक आणि चिकाटीने त्याच्या नोंदी ठेवून तयार केलेला प्राथमिक शिक्षणासाठीचा अमूल्य दस्तऐवज या पुस्तकाच्या माध्यमातून आपल्या भेटीस आणला आहे. पूर्वीपासून सहज आणि ओघवतेपणाने होणारे प्राथमिक शिक्षणच सध्य स्थितीला महत्वाचे,चिंतेचे आणि कठीण काम बनले आहे. मुलं ऐकतच नाहीत असा समाजात सूर उमटत असताना मुलाचं शिकणं ही औपचारिकता नसून तो एक आनंदाचा सोहळा असतो असं जर एखादा शिक्षक ठामपणे म्हणत असेल आणि आपल्या कृतीतून ते सिद्ध करून दाखवत असेल तर हा सोहळा आपल्या मुलांनीही आनंदाने अनुभवावा असं एक पालक,एक शिक्षक म्हणून मनापासून वाटतंच ना??म्हणूनच प्रत्येक शिक्षकासच नव्हे तर जगाच्या विशाल शाळेत मुलाला घडवण्याची इच्छा बाळगणाऱ्या प्रत्येक पालकांसाठीही अतिशय मार्गदर्शक असे हे पुस्तक सर्वांनी वाचायलाच हवे असे मला मनापासून वाटते. इतके सुंदर ,मार्गदर्शक पुस्तक आमच्या भेटीस आणल्याबद्दल लेखक युवराज माने सर यांचे मनापासून आभार आणि त्यांच्या पुढील वाटचालीसाठी खूप खूप शुभेच्छा...

**( विजया हिरेमठ या सांगली येथे मुलांसाठी वाचन कट्टे चालवतात, वाचनप्रेमी वाचनालय चालवतात,संवादिनी या त्याच्या महिलांच्या ग्रुपद्वारे समाजप्रबोधन करतात.त्या उत्तम लिहितात व एक उत्तम वाचक आहेत.)**

**संपर्क ९५११७६२३५१**


## स्त्रीभावविश्वाचा अचूक अन्वयार्थ..मौनातील अर्थ

ओळख पुस्तकाची!



सारिका रंधे
शिरपूर-धुळे

माझ्या साहित्यसखी मा.प्रा.त्रिशिला साळवे लिखित मौनातील अर्थ हे ललित गद्य वाचले. संसाराच्या भावविश्वातील पतीपत्नीच्या नात्यांची वीण अलगद ऊलगडत जाते हे त्यांचे वैशिष्ट्यपूर्ण लेखन होय! एकूण ५४ अभिलेखातून स्त्रीसुलभ भावभावनांचा वास्तवदर्शी अनुभव मांडतांना लेखिका कधी प्रेयसी बनून अवखळपणे वावरते तर कधी पत्नी बनून पतीपत्नीच्या नात्यांना दिशा देण्याचा यशस्वी प्रयत्न करते ,कधी ममतारुपी पैलूतून मुलांशी खंबीर मातृत्व फुलवताना दिसते.वयाच्या प्रत्येक टप्प्यावर संसारप्रपंच पेलण्यासाठी कधी कठोर तर कधी हळूवार भूमिका घेते. सहजीवनाच्या या रेशीम नात्यांतील सहज भाव ती टिपते.परखड वाटणारी तितकीच संवेद्य,निर्मळ, एकनिष्ठ पत्नी विविध वास्तवरुपी भूमिकेत दिसते.पतीच्या अवतीभोवती तीच स्त्रीसुलभ मन पिंगा घालीत असते तरीही तोचतोचपणा जाणवत नाही.थोर बहिणाबाई चौधरींच्या काव्यातील स्वर आठवतात अरे संसार-संसार जसा तवा चुल्ह्यावर आधी हाताले चटके तेव्हा मियते भाकर संसारातील सुर आळवताना लेखिका पारदर्शीपणे अनुभव नमूद करते सोबतच नात्यांनाही सबळ साच्यात बंद करते. तिच्यातील प्रतिभा बहरते ती नव्या वस्तुपाठ मांडताना ! ती म्हणते निसर्गाच्या तेजोनिधीला प्रकाशित होण्यासाठी साधारण निशेची गरज असते.मग तू सर्व करण्यास एकटा समर्थ कसा?कोणत्याही नात्यात अहंकार आला की नात्याचे धागे विरळ होत जातात. (२ खरचं माझ्याशिवाय तू परीपूर्ण?)जी व्यक्ती स्वत:वर प्रेम करते तीच व्यक्ती दुसऱ्यावर प्रेम करते. नाते ओझे होऊ नये या साऱ्यातून नात्याती महत्ता सांगितली आहे जे कोरोनाकाळात आपण अनुभवलेच! वैशिष्ट्यपूर्ण युग्मक ,प्रतिकांचा वापर जसे आता आपण शब्दांनी कमी आणि डोळ्यांनी जास्त बोलतो होय ना!जिथे आपुलकी




असते ,तिथेच भांडण होतं आणि तुझं माझं भांडण हा आपल्या निरतिशय प्रेमाचा एक भाग आहे.(५ तुझ्या साथीने)अशा कितीतरी भावना हे नातं समृद्ध करतात. वाऱ्याच्या झुळूकसारखं जीवन अगदीच नाजूक असतं

पहाटेच्या दवबिंदू सारखं जीवन अगदी उबदार असतं आईच्या कुशीतल्या ममतेसारखं ,जीवन अगदी सुवासिक असतं मोगऱ्याच्या गंधांसारख(१३ भ्रम) पुरूषप्रधान समाजात नात्यांतील विश्वासहार्यता ही एकट्याची जबाबदारी नसतेच हे विशद करताना लेखिकेने स्व:तील चुकांची सुद्धा कबुली देते. माझ्या जीवनाला तुझ्याशिवाय अर्थ नाही(१४ तू माझी प्रेरणा)नात्याला सुरवात नसतेच मुळी .ते सहज निर्माण होतं ते सहज उमलत जातं,जमीनीतून अंकुरणाऱ्या कोंबासारख ,ते निसर्ग नियमाने फुलतं सदाफुलीच्या फुलासारखं २५ अंत आपल्या नात्याला)नात्याला सकारात्मक साद ,आकार देणारे विचार वाचकाला आनंद देऊन जातात. आपण नेहमी स्त्रीबद्दल नेहमीच वाचतो कि स्त्री ही क्षणाची पत्नी न अनंत काळची माता आहे लेखिकेने नवविचार मांडला आहे कि पुरूष देखील क्षणाचा नवरा आणि अनंत काळासाठी पिता असतो पतीपत्नीचे नात्यातील रुसवे फुगवे,चढ-उतर हा स्वाभाविक भाग असला तरी तो किती क्षणिक असतो सात्विक असतो हे ऊलगडताना लेखिकेने नात्यांचे पदर ऊलगडत नवा आयाम प्रस्थापित केला आहे.नातं तुझं माझं असच बहराव मी तुझी पापणी तू अश्रू होवून बरसावं (४५)शब्दांपेक्षा स्पर्श अधिक बोलका असतो कुठल्याही नात्याला हे लागू पडतं.हे नातं जितक हळूवार तितकंच दिलखुलास असतं जीवन जगायला विश्वास खुप आवश्यक असतो.विश्वासाशिवाय नात म्हणजे पाण्याशिवाय मासा(५० ऐक जरासं)स्त्री समर्पण,आर्तता, लेखन वैशिष्ट्यासह व पैलूंसह ती परखडपणे ती व्यक्त होताना दिसते.रसिक वाचकांना खिळवून टाकणारी ही आत्मचरित्रपर कादंबरी होय!

## नवीन राष्ट्रीय शिक्षण धोरणाचे पाच नवीन उपक्रम

१) भारतीय सांकेतिक भाषा शब्दकोष - भारतीय सांकेतिक भाषा संशोधन आणि प्रशिक्षण केंद्र व्दारा विद्यार्थ्याऐचे भाषा कौशल्य वाढवण्यासाठी भारतीय सांकेतिक भाष (आइएसएल) शब्दकोष मध्ये १० हजार शब्द विकसित करण्यात आले आहेत.यात शालेय शिक्षण स्तरावर सार्वत्रिक डिजाइन ऑफ लर्निंग (यूडीएल) ला अनुरुप आइएसएल,स्पीच आणि टेक्स्ट तिघांचा समावेश करुन दीक्षा पोर्टल वर अपलोड केले आहे.यामुळे श्रवण बाधित शिक्षकांसह १३ लाख विद्यार्थी शिकण्यात देखील मदत होईल.

२)बोलणारे पुस्तक (टॉकिंग बुक्स)- नव्या धोरणात दृष्टिबाधित सर्व विद्यार्थ्यांसाठी एनसीईआरटीच्या सर्व पाठ्यपुस्तकांच्या ई-पब आवृत्तीला टेक्स्ट टू स्पीच अनुकूल बनवले आहे.याशिवाय एनसीईआरटीने २ हजार धड्यांवर आधारीत ऑडिओ देखील विकसित केले आहेत.ही सर्व सामग्री एनसीईआरटीचे संकेतस्थळ ई-पाठशाला आणि दीक्षा पोर्टल तसेच मोबाईल ऍप वर उपलब्ध आहे.२५ लाख दिव्यांग विद्यार्थी विशेषत: दृष्टिबाधित विद्यार्थ्यांच्या शिक्षणासाठी व वरदान ठरेल.

३)निष्ठा ३.०- एनसीईआरटी व्दारा शिक्षकांच्या फाऊंडेशन लिटरेसी आणि खेळण्यांवर आधारीत शिकण्याच्या प्रक्रियेवर प्रशिक्षणाचा विशेष अभ्यासक्रम विकसित केला आहे.निष्ठा३.० प्रशिक्षण दीक्षा प्लेटफॉर्म वर ऑनलाईन आयोजित केले जाईल.ते प्रादेशिक भाषांमध्येही उपलब्ध आहे.या प्रशिक्षणाच्या माध्यमातून २५ लाख शिक्षक आणि प्रधान शिक्षक लाभान्वित होतील.

४)विद्यांजली २ - विद्यांजली पोर्टल समुदाय आणि स्वयंसेवकांना त्यांच्या पसंतीच्या सरकारी आणि सरकारी अनुदान प्राप्त शाळांबरोबर थेट जोडून योगदान देण्यात सक्षम बनवेल. यात कुणीही सेवारत आणि सेवानिवृत्त शिक्षक सरकारी,निम सरकारी,अधिकारी,गृहिणी आणि अन्य कुणीही साक्षर व्यक्ति स्वेच्छेने योगदान देऊ शकतात.


५) शाळा गुणवत्ता मुल्यांकन आणि आश्वासन (स्कूल क्वालिटी एससेमेंट एंड एश्युरेंस)- नव्या शैक्षणिक धोरणानुसार केंद्रीय माध्यमिक शिक्षक मंडळ,केंद्रीय विद्यालये,नवोदय विद्यालयांसाठी स्टैंडर्ड सेटिंग अथॉरिटी (एसएसए) म्हणून काम करेल.सीबीएसई ने शाळांमधील कामकाजाच्या सर्व क्षेत्रांना सामावून घेत एसक्युएए आधारीत एक चौकट तयार केली आहे. ही स्वघोषणा वर आधारीत आहे. यात २५६०६ शाळा (२५ देशांमधील २५० शाळांसह),सुमारे २ कोटी मुले आणि १० लाख शिक्षक सामील आहेत.

# सहजीवन वेगवेगळे




डॉ.नंदा हरम
पुणे

आई:– अशा हाका मारतच महेश स्वयंपाकघरात शिरला.
आई :– काय रे बाळ ?
महेश : अग,काय एकेकाच्या तऱ्हा सहजीवनाच्या !
आई: कोणाच्या म्हणतो आहेस?
महेश: अग,रिमोरा आणि शार्क मासा आणि दुसरा नर अँग्लर फिश !
आई: थांब,थांब एकेका वेळी एकेक सांग.
महेश : ऐक मग,प्रथम सांगतो रिमोरा आणि शार्क माशांबद्दल जातीनुसार रिमोरा हा मासा १ ते ३ फुट लांबीचा असतो त्यांचे वैशिष्टये म्हणजे त्याचा पाठीवरच्या लांबवर्तुळाकार शोषकात रुपांतर होतं.




(आकृती क्र.१)

म्हणून त्याला 'सकर फिश' ही (sucker fish )म्हणतात.
आई: महेश...या शोषकांच्या आधारे तो कशाला तरी चिकटतो की काय?
महेश: अगदी बरोबर ओळखलंस ,आई या शोषकांच्या आधारे ते गुळगुळीत पृष्ठभागाला चिकटून राहू शकतात.बहुतेक वेळा देवमासा,कासव,शार्क अशाआश्रयदात्यांच्या आधारे ते आपलं आयुष्य व्यतीत करतात.
आई: हे शोषक नेमकं कसं काम करतं? काही कल्पना आहे तुला?
महेश: तु त्या आकृतीत पाहिलंस ना? पट्टयांसारखी त्या शोषकाची रचना असते.त्या उघड बंद झाल्यामुळे शोषणाची क्रिया घडते त्यामुळे ते आश्रयदात्या माश्याच्या त्वचेला घट्ट धरुन राहतात.ही दुसरी आकृती बघ.




(आकृती क्र.२)

आई: हा शोषक तर एखाद्या चकतीसारखा दिसतो नाही?
महेश: हो ना ही चकती घट्ट आणि लवचिक पटलापासून बनलेली असते.ही चकती वर–खाली केल्याने शोषणाची क्रिया निर्माण होते.तसेच ती मागे सरकवली की शोषण वाढतं आणि पुढे पोहत गेलं की शोषणं थांबतं.
महेश: महेश,मला एक सांग.ते कायम असे कोणाला तरी चिकटलेले असतात की ते स्वतंपणे पोहू ही शकतात?
महेश: ते स्वतंपणे पोहू पण शकतात.नागमोडी पध्दतीने त्यांची हालचाल असते.
आई : या रिमोरा माशाचा शार्कला काय फायदा?
महेश: शार्कच्या अंगवार,तोंडात परजीवी वाढतात.त्याला त्याचा त्रास होतो.रिमोरा हे परजीवी फस्त करतात.शार्क माशांचा त्रास

कमी होतो आणि रिमोरांना आनायासे अन्न मिळतं.

आई : शार्क माशांना ते चिकटलेले असल्यामुळे मस्तपैकी समुद्रात रिमोरा फिरु शकतात हो ना ?

महेश: हो तर....परत त्यांना शार्कमुळे संरक्षण मिळतं,ते वेगळंच रिमोरा शार्कच्या आजूबाजूचं पाणी अगदी स्वच्छ ठेवतात.तुला एक गंमत माहिती आहे का ?

आई : ती कोणती ?

महेश: बऱ्याच शार्कच्या जातींना रिमोराचं वावडं नसतं.पण काही जाती सँडबार आणी लेमन शार्क मात्र रिमोरांवर हल्ला करतात.त्यांना खाऊन टाकतात.अर्थात हे अपवादात्मक आहे.

आई: आणखी काही विशेष रिमोरांबद्दल ?

महेश: विशेष असं नाही.पण काही ठिकाणी कासवांना पकडायला रिमोरांचा उपयोग करतात.रिमोराच्या शेपटीला दोर बांधतात.कासव दृष्टिपधात आलं की बोटीतून रिमोराला पाण्यात सोडतात. तो बरोबर कासवाकडे जातो आणि त्याच्या कवसाला जाऊन चिकटतो.दोघांना ओढून घेतलं जातं.

आई: व्वा! छाग कल्पना आहे ?

महेश : आणि हो....एक सांगायचं राहिलं,आई हा मासा स्तब्ध पाण्यात राहू शकत नाही.याच्या कल्यावरुन खळळ ता पाण्याचा प्रवाह जात रहावा लागतो.

आई : महेश विचार शार्क माशाला चिकटून राहिल्यामुळे त्याची ही गरज आपोआप भागत असेल नाही. ?


महेश: खरंच की ?

आई : बाळा,रिमोराविषयी झालं असेल,तर मला त्यानंतर अँग्लर फिशाविषयी जाणून घ्यायची फार उत्सुकता वाटते.सांग ना.

महेश: आई,गंमत वाटते तुझी अशी उत्सुकता बघून...
या नंतर अँग्लर फिशची माहिती आहेच तशी गंमतीशीर.

आई: आता जास्त ताणू नकोय हं...

महेश : हा नर अँग्लर फिश सीरॅटिडी या कुलातीलं आहे.तो १६२ जातीचं प्रतिनिधीत्व करतो तो. समुद्रांत दीड ते दोन किलोमिटर खोलीवर आढळतो.




आई : अगदी खोल समुद्रातला मासा आहे हा ?

महेश : हो ...या माशाची मादी वैशिष्ट्यपूर्ण असते. तिचं डोकं मोठं असतं.

**(आकृती क्र.३ )**

दात मोठे आणि अणकुचीदार असतात.त्यांच्या पाठीवरील परापासून निघालेला एक लवलवता दांडा असतो, जो मशाच्या गळासारखा दिसतो.त्यांच्या टोकाला एक मांसल अवयव असतो,त्याला एस्का म्हणतात. या एस्कामध्ये जैविक प्रकाश देणारे जीवाणू असतात.

आई : हे कशाकरिता ?

महेश: अग आई,डोळ्यांसमोर चित्र आण बरं एवढ्या खोल समुद्रात काळोखात जेव्हा हे जीवाणू प्रकाशमान होतात आणि ही मादी इकडे-तिकडे फिरत असते.तेव्हा या प्रकाशाकडे पाण्यातले छोटे सजीव,मासे आकर्षित होतात.

आई : व्वा...म्हणजे आयती मेजवानी ?

महेश: मग.. अन्न मिळविण्यासाठी उपयोग तर होतोच...त्याच-बरोबर ती आपल्या जोडीदारालाही आकर्षित करुन घेते.

आई: अरे हो,तू नराविषयी विशेष माहिती सांगणार आहेस ना ?

महेश : हो सांगतो ना.या मादी आकाराने मोठ्या असतात. आतापर्यंत माहिती असलेली सर्वांत मोठी मादी ४ फु ट लांबीची आहे.पण नर...अगदी लहान, जेमतेम १४ सेमी. लांबीचे असतात.किशोरवयात जेव्हां ते मुक्त वावरतात,तेव्हा तर फक्त १.३ सेमी.लांबीचेच असतात..




आई: काय सांगतोय काय ?

महेश : तेव्हा त्यांन एक अणुकुचीदार चोचीसारखा दंतविरहित जबडा असतो.

**(आकृती क्र.४)**

जन्मापासून त्यांची घ्राणेंद्रीय चांगली विकसित झालेली असतात. त्यामुळे पाण्यातील कोणताही गंध ते चटकन ओळखू शकतात.

आई: त्यांचे डोळे ही मोठे वाटतात.

महेश : हो....ते अगदी वैशिष्ट्येपूर्ण असतात.अगदी अंधारातही आपल्या जोडीदाराला ओळखतात.त्यांच्या जीवनाचा एकमेव हेतूच जोडीदार शोधणे हा असतो.

आई : असं का म्हणतोस ?

महेश : अग,हे मासे आकाराने खूप लहान असल्यामुळे अन्न मिळवणं त्यांनी कठीण होवून बसतं.एवढंच नाही,तर काही जातीच्या नरांमध्ये अन्ननलिकेची वाढ एवढी खुरटते की अन्नग्रहण करणं शक्यच होत नाही.काही जणांच जबडे भक्ष्य पकडण्यायोग्य नसतात.

आई : मग... काय करतात ते ?

महेश : त्याकरिता त्यांना मादीशी जोडून घेणं आवश्यच असतं,नाहीतर नशिबी मरणच येतं.त्यांच्या संवेदनशील

घ्राणेंद्रीयां मुळ—मादीने पाण्यात सोडलेली संकेती रसायनं फेरोमोन्स त्यांना समजतात. एवढेच नाही तर, एस्का असलेल्या दांडयाची रचना,रंगद्रव्य तसेच प्रकाशाचा पॅटर्न हा प्रत्येक जातीचा विशिष्ट असतो.त्यामुळे हे नर त्यांच्याच जातीच्या मादीजवळ जातात.

आई : ऐकावे ते एकेक नवलच पण मग ते मादीला चिकटतात कसे?

महेश : मादीच्या जवळ जाताच ते तिच्या शरीराचा चावा घेतात आणि एक विकर सोडतात.स्त्रवलेल्या विकरामुळे त्यांच्या तोडातील आणि तिच्या अंगावरची त्वचा पचवली जाते. त्यामुळे रक्तवाहिन्यांच्या शरापर्यंत जाऊन नर मादीला जोडले जातात.




**(आकृती क्र.५)**

आई : आखणी काही बदल होतात का रे ?

महेश : हळूहळू नर आणि मादी, या दोघांची त्वचा एकत्र होवून वाढायलां लागते.नराचे डोळे पर आणि वापरात नसलेले अवयव नाहीसे होतात मादीच्या रक्तवाहिन्यांतून मिळणाऱ्या पोषक द्रव्यानंतर नराचं पोषण होतं श्वसन मात्र ते त्यांच्या कल्ल्यांच्या व्दारे करतात.

आई:पहिल्यादांच ऐकलेय हे सारं त्यांचं प्रजनन कसं चालतं?

महेश: नराचं शुक्राणू तयार करण्याचं काम अबाधित रहातं. राहतं.

आई : निसर्ग नियमच आहे तो बरं,पूढे

महेश :संप्रेरकांमुळे मादीच्या शरिरात तयार झालेली अंडी आणि नराच्या शरीरात तयार झालेले शुक्राणू फलना करीता एकाचवेळी परिपक्त होण्याची क्रिया घडते.मादी आपली अंडी जलसारख्या आवरणात बाहेर टाकते. हे आवरण ३० फुट लांब लांब असतं. ते एखाद्या स्पंजासारखं असतं. ते लगेच आणी शोषून घेतं या आवरणातच नर शुक्राणू सोडतात हे सारं घडलं खोल समुद्रात पण हे आवरण हलकं असल्यामुळे हळूहळू तरंगात पृष्ठभागावर येतं जेलमध्ये शुक्राणू व अंड्यांचं फलन होतं,त्यातुन नंतर अळ्या बाहेर पडतात.वरती पृष्ट भागावर त्यांना भरपूर अन्न मिळतं.आळ्यांचे पुढे छोटे मासे तयार होतात.मोठे झाल्यावर ते खोल समुद्रात येतात.

आई : खूपच वेगळं जीवनचक्र आहे या नर माशाचं ? बरं मला हे सांग,मादीला फक्त एक नर जोडला जातो की जास्त?

महेश : काही जातीमध्ये केवळ एकच नर पण काही जातींमध्ये यांची संख्या आठपर्यंत जाते.

आई : पण महेश,मला एक शंका आहे.हे सहजीवन आहे की परजीवन आहे?

महेश : मादी ॲग्लर फिश आणि एस्कामधील जीवाणू यांचे सहजीवन आहे,यात शंकाच नाही, आणि नर आणि मादी मधील ''लैगिक सहजीवन'' म्हणायला हरकत नाही.असं मला वाटतं दोघं एकाच जातीची आहेस,म्हणून?

आई : एका दृष्टिने,तू म्हणतोस ते पटतंय मला

संपर्क ९३७२९१०३०६

## सहकार्याचे विनम्र आवाहन...

शिक्षण यात्री मासिक नियमित प्रकाशन करताना होणारी आर्थिक कसरत पहाता आपणांस वर्गणीदार होऊन शिक्षण यात्री मासिकास आर्थिक स्थैर्य मिळवून देण्याची कळकळीची विनंती!!!!

वार्षिक वर्गणी- ४०० रूपये द्विवार्षिक वर्गणी - ७०० रूपये त्रैवार्षिक वर्गणी-१००० रूपये

शिक्षण यात्री या नावाने चेक/मनीआर्डर पोस्टाने पाठवू शकतात.

Online पेमेंट साठी--- खाते नाव-शिक्षणयात्री Shikshanyatri

बँक ऑफ बडौदा (राष्ट्रीय कृत) No--13320200000322 Ifsc-BARB0SHIRPU

**....वर्गणी पाठविल्यास पत्ता व जमा पावती बाबत कळविणे....**

With pay any app

संपर्क पत्ता- संपादक शिक्षण यात्री क्रांतीनगर मुपोता-शिरपुर जि-धुळे ४२५४०५

(मोबा.८२०८३०१००१/९८५०९६४६०१)

**स्तुत्य उपक्रम**

# शिक्षक कृतज्ञता निधी...




**सत्यवान शिरसाठ**

शिरपूर-धुळे


धुळे जिल्ह्यातील शिक्षकांनी शिक्षकांसाठी संकट काळात कर्तव्यभावना म्हणुन विनापद, विनाप्रतिष्ठा, संघटनाविरहीत फक्त कर्तव्यनिष्ठतेला स्मरुन,सेवाभावी वृत्तीने स्वेच्छेने सभासद होऊन सहभाग नोंदवीणारा स्व:निर्मित शिक्षक कृतज्ञता निधी हा एक नावीन्यपुर्ण उपक्रम आहे.कोरोना काळात शिक्षक कर्मचारी कोवीड कर्तव्य बजावत असताना जास्त संख्येने मृत्युमुखी पडत असताना कुटुंबावर येणारे आर्थिक संकट व शासनाची कोणतीच तात्काळ मदत मिळत नसल्याने ज्ञानदानाबरोबरच नेहमीच सामाजीक बांधीलकी जपणाऱ्या शिक्षकांतुन शिक्षक कृतज्ञता निधी सारख्या उपक्रमाची निर्मिती झाली.व एक आदर्श समाजापुढे ठेवला आहे.

या उपक्रमात संघटना,गट-तट सर्व बाजुला ठेवुन फक्त शिक्षक म्हणुन सामाजिक बांधालकी जपण्यासाठी एकत्र येऊन शिक्षक स्वयंसेवक या भुमिकेतुनच कार्य केले जाते.या उपक्रमात जिल्ह्यातुन ३१ स्वयंसेवक कार्य करत असुन त्यांना ज्येष्ठ मार्गदर्शक शिक्षक हे सेवाभावीपणे सहकार्य करत असतात.या उपक्रमात जिल्हा परीषद शिक्षक हे सभासद वर्गणी स्वयंसेवकांकडे जमा करुन सभासद होतात.तसेच सभासदाची नोंदणी गुगल लिंक व्दारे केली जाते.शिक्षक सभासदांची संपुर्ण आवश्यक माहीती एकत्रित केली जाते.व संग्रहीत ठेवली जाते.

या उपक्रमाची संहिता/नियमावली शिक्षकांच्या व सभासदांच्या खुल्या पध्दतीने ऑनलाइन व ऑफलाईन बैठकीतुन लोकशाही पध्दतीने सुचना व मते विचारात घेऊन तयार केली जाते.या संहितेनुसारच शिक्षक कृतज्ञतानिधीचे कामकाज चालते

सदर शिक्षक कृतज्ञतानीधी उपक्रमातील एखादा शिक्षक सभासदाचा कोणत्याही कारणात्सव दुर्देवी मृत्यु झाल्यास त्यांच्या कुटुंबियांना आर्थिक हातभार म्हणुन तात्काळ २ ते ३ दिवसाच्या आतच मदतनीधी सुपुर्द केला जातो..

यामध्ये जिल्ह्यात कोठेही शिक्षक मृत्यु झालेली बातमी समजताच स्वयंसेवक स्वत:सभासद असल्याची खात्री करतात व तात्काळ कुटुंबापर्यंत स्वत: जाऊन निधी दिला जातो..यामुळे सदर कुटुंबाला कमवता व्यक्ती गेल्याने लगेच आलेल्या आर्थिक संकटाचा भार कुटुंबावरचा हलका होतो व आपल्या कर्मचारी बांधवास खऱ्या अर्थाने श्रध्दांजली अर्पण केल्याचे समाधान सर्व सभासदांना वाटते

या उपक्रमात कोणतेही पद निर्माण केलेले नसुन जिल्ह्यातील व या उपक्रमातील सहभागी शिक्षकांपैकी सेवाभावी वृत्तीने काही शिक्षकच स्वयंसेवक म्हणुन आर्थिक व इतर नियोजन पाहत असतात.तसेच हा उपक्रम योग्य नियोजनपुर्वक होण्याबाबत वरिष्ठ सेवाभावी शिक्षक मार्गदर्शकाची भुमिका बजावत असतात.दर तीन महिन्याने सर्व

सहभागी सभासदांना हिशोब ऑनलाइन पध्दतीने वाट्सअप गृपच्या माध्यमातुन कळविला जात असुन आर्थिक पारदर्शकता जपली जाते.सेवाभावी शिक्षक स्वयंसेवक जमा रक्कमेची एफ.डी. शिक्षक पतपेढी किंवा राष्ट्रीयकृत बँकेत करतात ,एफ.डी,वरील व्याजाचाही हिशोब दिला जातो.या उपक्रमातील नया पैसाही मदतनीधी व्यतिरीक्त खर्च केला जात नाही. सभासदांबाबत दुर्देवी घटना घडल्यास आवश्यक रकमेची एफ.डी.मोडुन सदर मदतनीधी वारसास २-३ दिवसांतच स्वयंसेवक सुपुर्द करतात... शिक्षक कृतज्ञता निधीची सुरवात १ नोव्हेंबर २०२० रोजी झाली होती. पहिल्या वर्षी टप्पा क्र.१ मध्ये शिक्षकांनी प्रत्येकी १,००० रुपये सभासद निधी या उपक्रमात जमा केला होता.जिल्हाभरातुन एकुण १०९६ सभासद सहभागी झालेले होते.एकुण रक्कम१०,९६०० झालेली होती.

वर्षभरात २६ आक्टोबरपर्यंत जिल्हाभरातील ८ शिक्षक सभासदांचा कोवीड व इतर आजाराने आकस्मीत मृत्यु झाले.सर्व ८ सभासदांना संहितेतील नियमानुसार प्रत्येकी १ लाख रुपये कुटुंबातील वारसास घटना घडल्यानंतर २-३ दिवसांमध्येच चेकव्दारे बँक खात्यावर सुपुर्द करण्यात आले.असे एकुण ८ लाख रुपये सदर दुर्देवाने मृत्युमुखी पडलेल्या कृतज्ञतानिधीत सहभागी शिक्षकांच्या कुटुंबियांना सुपुर्द करण्यात आले. तसेच DCPS/NPS धारक शिक्षकांना पेन्शन व इतर लाभ नसल्याने सदर सहभागी शिक्षक सभासदांच्या कुंटीबियांना निश्चीत केल्याप्रमाणे अतिरीक्त मदतनिधी देण्याचे ठरलेले आहे.मागील वर्षाप्रमाणेच यावर्षीही शिक्षक कृतज्ञतानिधीचा टप्पा क्र.२ ची सभासद नोंदणी २७ सप्टेंबर पासुन सुरु झालेली आहे.या वर्षीही खुल्या बैठकीव्दारे लोकशाही पध्दतीने संहिता/नीयमावली तयार करण्यात आली असुन टप्पा क्र.२ मध्ये १२०० रु सभासद वर्गणी करण्यात आलेली असुन मदतनीधीही दुप्पट करण्यात आलेली आहे.टप्पा क्र.२ मधील संहितेनुसार सभासदाच्या दुर्देवी प्रसंगानंतर मृत्यु पश्चात जुनी पेंशन धारक शिक्षक सभासदांच्या वारसास जमा रक्कमेच्या १०% किंवा जास्तीत जास्त २ लाख रुपये व नवी पेंशन NPS धारक शिक्षक सभासदांच्या वारसास जमा रक्कमेच्या १५% किंवा जास्तीत जास्त ३ लाख रुपये देण्याचे निश्चीत केलेले आहे.

टप्पा क्र.२ मध्ये २३५० सभासद नोंदणी झालेली आहे.या दुसऱ्या टप्यात धुळे जिल्ह्याचे प्राथमिकचे मा.शिक्षणाधिकारी मनिष पवार,तसेच बहुंताश तालुक्याचे गटशिक्षणाधीकारी,सर्व विस्ताराधिकारी,केंद्रप्रमुख यांनीही शिक्षकहिताच्या उपक्रमात सभासद होऊन शिक्षकांना सभासद होण्याबाबत प्रेरीत केलेले आहे. १ नोव्हेंबर २०२१ पासुन दुसरा टप्पाची प्रत्यक्ष अमलबजावणी सुरु झालेली आहे.

शिक्षक कृतज्ञतानीधीची सुरवात धुळे जिल्ह्यातील शिक्षकांकडुन प्रथम करण्यात आली असुन इतर ४-५ जिल्ह्यातील शिक्षकही सदर उपक्रम राबविण्याच्या तयारीत आहेत...अंधारासारख्या संकटाला..

दोष देत बसण्याऐवजी...
...एक ज्योत पेटवण्याचे धाडस दाखवुया...
..तरच अंधार दूर होईल..
..आपल्या नशीबाचा...
कर्तृत्वावर जास्त विश्वास असावा...
कारण उद्या येणारी वेळ...
आपल्या नशीबामुळे नाही.
तर कर्तृत्वा सोबत दातृत्वा तून सिद्ध होईल ...
म्हणून संवेदनशीलतेतुन सृजनशीलतेकडे जाऊया...
एक बनु या नेक बनु या..
या अंधारी काळात एक दिवा मानवतेचा पेटवुया....
हा आदर्श उपक्रम इतर जिल्ह्यांनीही राबवयाला हवा.

**संपर्क ९७०२०२६५१२**

**शासन निर्णय...**

## महाराष्ट्र शासन

## सामान्य प्रशासन विभाग

## कोरोनाच्या पार्श्वभूमीवर परीक्षेला बसण्यासाठी संधी देणेबाबत..

**दि.१७ डिसेंबर,२०२१**

**संकेतांक २०२११२१७१७२७५८८८०७**

कोरोनाच्या पार्श्वभूमीवर शासकीय सेवेत सरळ सेवेने नियुक्ती संदर्भात जाहिराती प्रसिद्ध झाल्या नसल्याने या कालावधीत काही उमेदवारांची कमाल वयोवमर्यादा ओलांडली गेली असल्याने त्यांची परीक्षेस बसण्याची संधी हुकली आहे. अशा उमेदवारांना स्पर्धा परीक्षांना बसण्यासाठी संधी उपलब्ध करून देण्यासंदर्भात मंत्री मंडळाच्या दि.१० नोव्हेंबर २०२१ च्या बैठकीत चर्चा झाल त्यानुसार अशी संधी उपलब्ध करून देण्याची बाब शासनाचे विचाराधीन होती.

कोरोनाच्या पार्श्वभूमीवर शासकीय सेवेत सरळसेवेने नियुक्ती संदर्भात दि. ०१ मार्च २०२० पासून जाहिराती प्रसिध्द न झाल्यामुळे, शासनाने संबंधित पदाच्या सेवाप्रवेश नियमाद्वारे किंवा संदर्भाधीन दि. २५.०४.२०१६ च्या शासन निर्णयाद्वारे नियुक्तीकरिता विहित केलेली कमाल वयोमर्यादा, दि. ०१ मार्च, २०२० ते या शासन निर्णयाच्या दिनांकपर्यंतच्या कालवधीत, ज्या उमदेवारांनी ओलांडली आहे, अशा उमेदवारांना या शासन निर्णयाच्या दिनांकापासून दि. ३१ डिसेंबर २०२२ पर्यत, शासकीय सेवेत सरळसेवेने नियुक्ती संदर्भात ज्या जाहिराती प्रसिध्द होतील, त्या जाहिरांतीसाठी ''एक वेळची विशेष बाब'' म्हणून परीक्षेस बसण्याची संधी देण्यात येत आहे.

कोरोनाचा प्रादुर्भाव कमी झाल्याने, ज्या प्रकरणी नजीकच्या काळात जाहिराती प्रसिध्द झाल्या असून जाहिरातींमध्ये नमूद केलेला अर्ज करण्याचा शेवटचा दिनांक, या शासन निर्णयाच्या दिनांकानंतरचा असेल, अशा प्रकरणी देखील दि. ०१ मार्च २०२० ते या शासन निर्णयाच्या दिनांकपर्यंतच्या कालावधीत संबधित पदाच्या सेवाप्रवेश नियमाद्वारे किंवा संदर्भाधीन दि.२५.०४.२०१६ च्या शासन निर्णयाद्वारे नियुक्तीकरिता विहित केलेली कमाल वयोमर्यादा ज्या उमेदवारांनी ओलांडली आहे, अशा उमेदवारांसाठी देखील 'एक वेळची विशेष बाब' म्हणून परीक्षेस बसण्याची संधी देण्यात येत आहे.

कोरोनाचा प्रादुर्भाव कमी झाल्याने, ज्या प्रकरणी नजीकच्या काळात जाहिराती प्रसिध्द झाल्या असून जाहिरातींमध्ये नमूद केलेला अर्ज करण्याचा शेवटचा दिनांक या शासन निर्णयाच्या दिनांकापूर्वी उलटून गेला आहे, मात्र प्रत्यक्षात परीक्षांचे आयोजन करण्यात आलेले नाही, अशा प्रकरणी देखील दि. ०१ मार्च, २०२० ते या शासन निर्णयाच्या दिनांकापर्यंतचा कालावधीत संबंधित पदाच्या सेवाप्रवेश नियमाद्वारे किंवा संदर्भाधीन दि. २५.०४.२०१६ च्या शासन निर्णयाद्वारे नियुक्तीकरिता विहित केलेली कमाल वयोमर्यादा ज्या उमेदवारांनी ओलांडली आहे, अशा उमेदवारांसाठी अर्ज सादर करण्यास्तव महाराष्ट्र लोकसेवा आयोग अथवा संबंधित निवड समितीने ''एक वेळची विशेष बाब'' म्हणून परवानगी द्यावी. जेणेकरून त्यांना देखील परीक्षेस बसण्याची संधी प्राप्त होईल.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेस्थळावर उपलब्ध करून करण्यात आला. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करून काढण्यात येत आहे.

| **मराठी मासिक** **शिक्षणयात्री** | हे मासिक वृत्तपत्र मालक, प्रकाशक,संपादक शैला नंदकिशोर हजारे यांनी मुद्रक सतिष कमलसिंग गिरासे यांच्या मालकीच्या यशवंती ऑफसेट १ ला माळा शिवाजी मार्केट शिरपूर, ता.शिरपूर जि.धुळे ४२५४०५(महाराष्ट्र) येथे छापून ३४, क्रांतीनगर,१ली गल्ली, शिरपूर ता. शिरपूर जि.धुळे ४२५४०५ (महाराष्ट्र). येथे प्रकाशित केले. संपादक –शैला नंदकिशोर हजारे **Reg No.** |
|---|---|

Reg No. MAHMAR2015/67226 शिक्षणयात्री Postal Registration No.DHL/557/2021-23










# सहकार्याचे विनम्र आवाहन...

शिक्षण यात्री मासिक नियमित प्रकाशन करताना होणारी आर्थिक कसरत पहाता आपणांस वर्गणीदार होऊन शिक्षण यात्री मासिकास आर्थिक स्थैर्य मिळवून देण्याची कळकळीची विनंती!!!!

वार्षिक वर्गणी– ४०० रूपये    द्विवार्षिक वर्गणी – ७०० रूपये    त्रैवार्षिक वर्गणी–१००० रूपये

शिक्षण यात्री या नावाने चेक/मनीआर्डर पोस्टाने पाठवू शकतात.

Online पेमेंट साठी--- खाते नाव-शिक्षणयात्री Shikshanyatri

बँक ऑफ बडौदा (राष्ट्रीय कृत) No--13320200000322 Ifsc-BARB0SHIRPU

With pay any app

**....वर्गणी पाठविल्यास पत्ता व जमा पावती बाबत कळविणे....**

संपर्क पत्ता– संपादक शिक्षण यात्री क्रांतीनगर मुपोता–शिरपुर जि–धुळे ४२५४०५

(मोबा.८२०८३०१००१/९८५०९६४६०१)

Postal Registration No.DHL/557/2021-23

प्रेषक
संपादक –२९,क्रांतीनगर,१ली गल्ली,
शिरपूर ता.शिरपूर जि.धुळे
भ्रमणध्वनी : ८२०८३०१००१

प्रती, ..................................................

..................................................

..................................................

Pragati Arts Shirpur 8421356261